*For Private Circulation Only*

# Study Circle Career Development Institute

सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागातील

## समाजकल्याण आयुक्तालयातील अधिकारी भरती परीक्षा कोर्स

१) सहायक आयुक्त, समाजकल्याण व तत्सम, गट–अ

२) समाजकल्याण अधिकारी, गट–ब

३) गृहप्रमुख, गट–ब

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: डीआरए-०५२१/प्र.क्र.०३/२०२३/जाहिरात जाहिरात क्रमांक: ०२३/२०२३

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत **सहायक आयुक्त, समाज कल्याण व तत्सम, गट-अ** या संवर्गातील पद भरती करीता विहित ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**२. उपलब्ध पदसंख्या:-** ४१

**३. भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकूण आरक्षण | अराखीव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदे | ०७ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | -- | ०१ | ०४ | ०४ | २१ | २० | ४१ |
| सर्वसाधारण | ०५ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | -- | ०१ | ०३ | ०३ | १६ | १२ | २८ |
| महिला | ०२ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०५ | ०७ | १२ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| अनाथ | -- | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | एकूण ४१ पदांपैकी - ०२ पदे दिव्यांगांकरीता आरक्षित [कर्णबधीरता / ऐकू येण्यातील दुर्बलता - ०१ पद आणि अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षाघात / कुष्ठरोग मुक्त / शारिरीक वाढ खुंटणे / आम्ल हल्लाग्रस्त / स्नायू विकृती - ०१ पद] | | | | | | | | | | | |

क्रमांक: डीआरए-०५२१/प्र.क्र.०३/२०२३/जाहिरात जाहिरात क्रमांक: ०२४/२०२३

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत **समाज कल्याण अधिकारी, गट-ब** या संवर्गातील पद भरती करीता विहित ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**२. उपलब्ध पदसंख्या:-** २२

**३. भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकूण आरक्षण | अराखीव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदे | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०२ | -- | -- | ०२ | ०२ | १४ | ०८ | २२ |
| सर्वसाधारण | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | -- | -- | ०१ | ०१ | ०९ | ०६ | १५ |
| महिला | ०१ | ०१ | -- | -- | ०१ | -- | -- | ०१ | ०१ | ०५ | ०२ | ०७ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अनाथ | -- | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | एकूण २२ पदांपैकी - ०१ पद दिव्यांग अंध / अल्पदृष्टी करीता साठी राखीव | | | | | | | | | | | |

क्रमांक: डीआरए-०५२१/प्र.क्र.०३/२०२३/जाहिरात जाहिरात क्रमांक: ०२५/२०२३

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत **गृहप्रमुख, गट-ब** या संवर्गातील पद भरती करीता विहित ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**२. उपलब्ध पदसंख्या:-** १८

**३. भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकूण आरक्षण | अराखीव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदे | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | -- | -- | ०२ | ०३ | ११ | ०७ | १८ |
| सर्वसाधारण | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | -- | -- | ०१ | ०२ | ०८ | ०५ | १३ |
| महिला | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०३ | ०२ | ०५ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अनाथ | -- | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | एकूण १८ पदांपैकी - ०१ पद दिव्यांग अंध / अल्पदृष्टी करीता साठी राखीव | | | | | | | | | | | |

# १) सहायक आयुक्त, समाजकल्याण व तत्सम, गट-अ

**८. शैक्षणिक अर्हता आणि अनुभव:-**

**८.१ शैक्षणिक अर्हता -** (१) Possess a degree in Arts, Science, Commerce or Law in at least the Second Class of a Statutory University; **AND**

(२) Possess two years post graduate diploma or degree in Social Work or Social Welfare Administration of a recognised University or Institute or Second Class post graduate Diploma or degree in Social Work or Social Welfare Administration of a recognised University.

**८.२ प्राधान्यशील अर्हता:-** Provided further that preference may be given to candidates who -

(१) Have administrative experience in Social Welfare Department or who have experience in a responsible capacity in a field of Social Welfare or Backward Class Welfare or both: or

(२) Have made special contribution to social welfare including Backward Class welfare which can be substantiated by evidence.

**८.३** Notwithstanding anything contained in clause 8.1(1) above if at any state of selection, the Commission is of the opinion that sufficient number of candidates possessing the requisite higher basic academic qualification are not available to fill up the vacancies reserved for candidates belonging to Schedule Caste, Schedule Tribes, Denotified Tribes or Nomadic Tribes, then the Commission may, in the matter of such selection, relax the requirement of the class of the degree set out therein, and select suitable candidate belonging to such Caste or Tribes to fill up such vacancies.

**८.४ शैक्षणिक अर्हता गणना करण्याचा दिनांक:-**

प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

# २) समाजकल्याण अधिकारी, गट-ब

**८. शैक्षणिक अर्हता:-**

**८.१ शैक्षणिक अर्हता -** (१) Have thorough knowledge of Marathi; **AND**

(२) Possess a degree of a recognised University, if they belong to the Backward Classess, and a degree in Social Welfare Sciences or Social Work of a recognised University or Institute, Otherwise;

(३) शासन पत्र, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सकआ-२०२२/प्र.क्र.२७४/आस्था-२, दिनांक २१ एप्रिल, २०२३ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार, दिव्यांग, अनाथ व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक यांचेसाठी मागासवर्गीयांसाठी जी शैक्षणिक अर्हता ग्राह्य धरण्यात येते ती शैक्षणिक अर्हता ग्राह्य धरण्यात येईल.

**८.२ प्राधान्यशील अर्हता:-** Provided that preference may be given to candidates possessing any or all of the following additional qualifications namely:-

(१) Experience of administration or social services; **AND**

(२) The Diploma of the Tata Institute of Social Sciences or the Diploma in Social Work of the Calcutta University or the M.A. Degree in Social Sork of the Maharaja Sayajirao University of Baroda or Delhi University or the M.A. Degree in Labour and Social Welfare of the Patana University.

**८.३ शैक्षणिक अर्हता गणना करण्याचा दिनांक:-**

प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

# ३) गृहप्रमुख, गट-ब

**८. शैक्षणिक अर्हता आणि अनुभव:-**

**८.१ शैक्षणिक अर्हता -** (१) A Bacheler's degree in Arts, Science, Commerce, Law or Agriculture in atleast the Second Class of a recognised University; **AND**

(२) A degree in Education of a recognised Univeristy or an equivalent qualification; **AND**

**८.२ अनुभव:** Have not less than five years teaching and or administrative experience in an educational institution.

**८.३ प्राधान्यशील अर्हता:-** Provided that preference will be given to candidates possessing Master's Degree in Arts, Science, Commerce, Law or Agriculture and or practical training in Psychology or Methodology.

**८.४ शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा कालावधी गणना करण्याचा दिनांक:-**

**८.४.१** प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**८.४.२** अनुभवाच्या कालावधीची गणना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास करण्यात येईल.

**८.४ अनुभवाच्या दाव्यांबाबत:-**

आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विविध स्वरुपाचे दावे करताना अथवा दावे अद्ययावत करताना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अनुभवाच्या दाव्यांनुसार पात्र होण्यासाठी उमेदवाराने Nature of Job - Teaching and or Administrative असे नमूद करणे अनिवार्य आहे. त्याशिवाय, ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज स्वीकृत होऊ शकणार नाही.

**९. कर्तव्ये व जबाबदा-या:-** प्रस्तुत संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१०. निवडप्रकिया:-**

१०.१ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही.

१०.२ जाहिरातीस अनुसरून प्राप्त अर्जांची संख्या आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोयीस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता/अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल.

१०.३ चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही.

१०.४ चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी (लागू असल्यास) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

१०.५ चाळणी परीक्षा घेतल्यास चाळणी परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरित्या विचारात घेऊन तर चाळणी परीक्षा न झाल्यास केवळ मुलाखतीच्या गुणांच्या आधारे उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

१०.६ मुलाखतीमध्ये किमान ४१% व त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच शिफारशीसाठी विचार केला जाईल.

१०.७ प्रस्तुत पदाची निवड प्रक्रिया तत्कालिन शिक्षण व समाज कल्याण विभागातील गृहप्रमुख, गट-ब (सेवाप्रवेश नियम) १९६४ तसेच आयोगाकडून वेळोवेळी सुधारण्यात येणा-या कार्यनियमावली / कार्यपध्दतीनुसार राबविण्यात येईल.

१०.८ अंतिम शिफारस यादी तयार करताना समान गुण धारण करणा-या उमेदवाराची क्रमवारी (Ranking) आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकामधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

Study CIRCLE

**विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी व तत्सम पद, सामान्य राज्य सेवा, गट-अ, या पदांच्या चाळणी परीक्षेचा तपशील.**

सदर चाळणी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ स्वरूपाची म्हणजेच बहुपर्यायी प्रश्न असलेली एकच प्रश्नपत्रिका असेल. प्रस्तुत प्रश्नपत्रिका १५० बहुपर्यायी प्रश्नांची व १५० गुणांची व दीड तासाची असेल तसेच या प्रश्नपत्रिकेचे माध्यम फक्त मराठी असून तिचा दर्जा पदवी परीक्षेसमान असेल सदरहू प्रश्नपत्रिकेचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे राहील .

| अनुक्रमांक | घटक |
|---|---|
| १. | **समाजकल्याण अध्ययन : (७५ गुण)**<br>-समाजकार्याचा इतिहास व तत्वज्ञान<br>-मानवी अभिवृध्दी व व्यक्तिमत्व विकास<br>-समाज कल्याण प्रशासन<br>-भारतीय सामाजिक समस्या<br>-समाजकार्याच्या संबधित समाजशास्त्र व अर्थशास्त्र |
| २. | **सामान्य अध्ययन : (२५ गुण)**<br>-आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास<br>-भारताचा विशेषत; महाराष्ट्राचा भुगोल<br>-भारतीय राज्यव्यवस्था<br>-राज्य प्रशासन व स्थनिक प्रशासन (ग्रामीण तसेच शहरी ) याची रचना, अधिकार व कार्य<br>-भारतीय अर्थव्यवस्था, सामान्य विज्ञान, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चालू घडामोडी |
| ३. | **बुध्दिमापन चाचणी : (५० गुण)**<br>-उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो, याचा अंदाज घेण्याच्या दृष्टीने या चाचणीमध्ये प्रश्न असतील. |

# समाजकल्याण अधिकारी,गट- 'ब' या पदाची चाळणी परीक्षा

दर्जा : पदवी
माध्यम : मराठी
प्रश्नपत्रिकेचे स्वरुप : वस्तुनिष्ठ

प्रश्न / गुण : १५०
कालावधी : दीड तास

---

-: अभ्यासक्रम :-

**सामान्य ज्ञान (विषय संकेतांक- ९१२) या विषयामध्ये खालील घटक व उपघटकांचा समावेश असेल.**

**१. कला शाखेतील घटक :**

(१) आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास (१८५७-१९९०)
(२) भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा भूगोल
(३) भारतीय राज्यपद्धती व ग्राम प्रशासन

**२ विज्ञान व अभियांत्रिकी**

(१) वैज्ञानिक विचारसरणी व दृष्टिकोन - विज्ञानाचे स्वरूप, विज्ञानाची पूर्वगृहितके, शास्त्रीय पद्धती , वैज्ञानिक ज्ञान
(२) आधुनिकीकरण व विज्ञान - आधुनिकीकरण म्हणजे काय, आधुनिकीकरणाचे प्रकार, आधुनिकीकरण व भारत (समस्या व उपाय)
(३) जागतिक तसेच भारतातील वैज्ञानिक व अभियांत्रिकी प्रगती
(४) वैज्ञानिक प्रगतीमुळे शहरी तसेच ग्रामीण जीवनावर झालेला परिणाम
(५) भारतीय समस्यांवर वैज्ञानिक उपाय, उदा. ऊर्जा समस्या, अन्नधान्य समस्या, लोकसंख्या समस्या, पर्यावरण समस्या,शैक्षणिक समस्या, गृहनिर्माण समस्या, परिवहन समस्या,संपर्क विषयक समस्या, लोकस्वास्थ्य, इत्यादी

**३. वाणिज्य व अर्थव्यवस्था**

(१) भारतीय आयात - निर्यात
(२) राष्ट्रीय विकासात सरकारी, सहकारी, ग्रामीण बँकांची भूमिका
(३) शासकीय अर्थव्यवस्था - अर्थसंकल्प, लेखा, लेखापरीक्षण, इत्यादी
(४) किंमती वाढण्याचे कारणे व उपाय

**४. समाजकल्याण अध्ययन**

(१) समाजकार्याचा इतिहास व तत्वज्ञान
(२) मानवी अभिवृध्दी व व्यक्तिमत्व विकास
(३) समाज कल्याण प्रशासन
(४) सामाजिक सुरक्षा विषयक कायदे व अंमलबजावणी (पीसीआर,पीओए,बाल कामगार कायदा इत्यादी)
(५) भारतीय सामाजिक समस्या व त्यावरील उपाययोजना
(६) समाज कार्याच्या संबंधित समाजशास्त्र व अर्थशास्त्र

**५. जागतिक तसेच भारतातील चालू घडामोडी -**

राजकीय,औद्योगिक,आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, भौगोलिक, खगोलशास्त्रीय, सांस्कृतिक, वैज्ञानिक, इत्यादी.

**६. बुद्धिमापन विषयक प्रश्न -**

उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करू शकतो याचा अंदाज घेण्याच्या दृष्टिने सदर प्रश्न विचारण्यात येतील.

## अभ्यासक्रम

**गृह प्रमुख, सामान्य राज्य सेवा, गट - ब, शासकीय मागासवर्गीय वसतिगृह, समाजकल्याण संचालनालय - पुणे, चाळणी परीक्षा-२०१०.**

**सदर पदाच्या चाळणी परीक्षेची तारीख लवकरच आयोगाच्या वेब-साईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.**

---

**दर्जा** : पदवी — **माध्यम** : मराठी

**प्रश्नपत्रिकेचे स्वरुप** : वस्तुनिष्ठ — **कालावधी** : दीड तास

**प्रश्नसंख्या** : १५० — **गुण** : १५०

---

| अनु. क्र | तपशील | गुण |
|---|---|---|
| १ | **(I) अध्यापन अभियोग्यता**<br>अध्यापन:<br>स्वरुप, उद्दिष्टे, वैशिष्ट्ये आणि मूलभूत आवश्यक बाबी.<br>अध्ययनकर्त्याची वैशिष्ट्ये<br>अध्यापनावर परिणाम करणारे घटक<br>अध्यापनाच्या पध्दती<br>अध्यापन साधने<br>मूल्यमापन पध्दती | गुण १५ |
| | **(II) संशोधन अभियोग्यता**<br>संशोधन :<br>अर्थ, वैशिष्ट्ये आणि प्रकार<br>संशोधनाचे टप्पे<br>संशोधनाच्या पध्दती<br>संशोधनाचे नीतिशास्त्र<br>शोध निबंध, लेख, कार्यसत्र, चर्चासत्र, परिषद व परिसंवाद<br>प्रबंध लेखन त्याची वैशिष्ट्ये आणि रुपरेखा | |
| | **(III) वाचन आकलन :**<br>उतारा व त्यावर आधारित उत्तरे दयावयाच्या प्रश्नांचा संच | |
| | **(IV) संप्रेषण :-**<br>संप्रेषण<br>स्वरुप, वैशिष्ट्ये, प्रकार,अवरोधक आणि परिणामकारक वर्ग संप्रेषण | |
| | **(V) आधारसामग्री अर्थउकल:-**<br>आधारसामग्रीचे स्त्रोत, संपादन आणि अर्थउकल<br>संख्यात्मक व गुणात्मक आधारसामग्री<br>आधारसामग्रीचे आलेखीय प्रतिरुपण व प्रतिचित्रण | |
| | **(VI) माहिती व संज्ञापन तंत्रज्ञान :**<br>माहिती व संज्ञापन तंत्रज्ञान :<br>अर्थ, फायदे, तोटे व वापर<br>सर्वसाधारण संक्षिप्त रुपे व परिभाषा<br>इंटरनेट व ई मेलचे मूलभूत आधार | |

| | | |
|---|---|---|
| | **(VII) लोकसमुदाय व पर्यावरण**<br>लोकसमुदाय आणि पर्यावरण आंतरक्रिया<br>प्रदूषणाचे स्त्रोत;<br>प्रदूषणाचे घटक आणि त्यांचा मानवी जीवनावरील परिणाम<br>नैसर्गिक व ऊर्जा साधनसंपत्तीचे शोषण<br>नैसर्गिक आपत्ती आणि ती कमी करण्यासाठी उपाययोजना. | |
| | **(VIII) उच्च शिक्षण पध्दती : शासन, राजनीती व प्रशासन**<br>भारतातील उच्च शिक्षण व संशोधन संस्थाची संरचना<br>औपचारिक व दूरशिक्षण; व्यावसायिक/तांत्रिक व सर्वसाधारण शिक्षण; मूल्य धारित शिक्षण; शासन, राजनीती व प्रशासन; संकल्पना, संस्था व त्यांच्या आंतरक्रिया | |
| | **(IX) गृह विज्ञान :**<br>पोषण आहार विज्ञान<br>पोषक आहाराचे मूलघटक,<br>पोषक आहार विषयक जीव-रसायनशास्त्र<br>अन्नविषयक सूक्ष्मजीवशास्त्र<br>सार्वजनिक पोषक आहार<br>उपचारशास्त्रीय पोषक आहार | |
| | **(X) समाज कार्य :-**<br>व्यक्तीच्या एकूण आयुर्मानातील मानवी अभिवृध्दी व विकास.<br>व्यक्तिमत्वाच्या उपपत्ती व सामाजिकीकरण यांचे अध्ययन.<br>भारतीय सामाजिक समस्यांची संकल्पना व कारक घटक यांचे विश्लेषण. सामाजिक समस्यांच्या बाबतीतील हस्तक्षेप - सूक्ष्म व मोठया स्तरावरील शासनाचे व स्वयंसेवी प्रयत्न.<br>सामाजिक समस्या ओळखण्यात व समुचित धोरणाचा विकास करण्यात समाज कार्यकर्त्यांची भूमिका<br>कुटुंबांच्या लोकसंख्याशास्त्रीय व सामाजिक परिस्थितीतील बदल - भारतीय स्त्रिया, युवक, वयोवृध्द व मुले.<br>भारतातील कुटुंबे, स्त्रिया, युवक, वयोवृध्द व मुले यांच्या समस्या.<br>कुटुंबे, स्त्रिया व मुले यांच्यासाठी सामाजिक कायदे.<br>कुटुंबे, स्त्रिया, युवक, वयोवृध्द व मुले यांच्यासाठी शासकीय व अशासकीय संघटनांची. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर धोरणे, कार्यक्रम व सेवा.<br>कुटुंबे, मुले, स्त्रिया, वयस्कर आणि विशेष गरजा असलेले लोक यांच्याबाबतीत समाज कार्याद्वारे हस्तक्षेप | |

| | | |
|---|---|---|
| २ | प्रशासकीय नियम व सुविधा यांचे ज्ञान<br>**I) शासकीय वसतीगृहाचे उद्देशाचे पालन करणे.**<br>शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे.<br>शैक्षणिक मागासलेपण दूर करणे.<br>शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे.<br>मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी करणे.<br>शैक्षणिक दृष्टिकोन वृध्दींगत करणे. | गुण १५ |
| | **II) प्रशासकीय जबाबदारी:-**<br>कार्यालय प्रमुख म्हणून काम पहाणे.<br>वसतीगृहाचे व्यवस्थापन पहाणे.<br>प्रशासकीय बाबी पहाणे. | |
| | **III) आर्थिक बाबी :-**<br>आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पहाणे.<br>खर्चाचे नियोजन करणे.<br>वित्तीय नियमावलींचे पालन करणे.<br>वित्तीय औचित्याचे पालन करणे.<br>रोख नोंदवही ठेवणे.<br>वित्तीय नोंदवही ठेवणे.<br>लेखापरिक्षणाच्या पूर्तता करणे.<br>सर्व देणी वेळेवर देणे. | |
| | **IV) सोयीसुविधा देणे:-**<br>निवास- गादी, अंथरुण, पांघरुण,इ.<br>भोजन.<br>शैक्षणिक- पुस्तके, वही, स्टेशनरी, .<br>ग्रंथालय.<br>निर्वाहभत्ता<br>क्रिडा- खेळ साहित्य.<br>मनोरंजन. | |
| | **V) पर्यवेक्षण:-**<br>शैक्षणिक प्रगती व विकास.<br>भोजन व्यवस्था.<br>नियमित व दैनंदिन कामकाज.<br>शिस्त पालन बाबी. | |
| | **VI) पालकत्वाची भूमिका:-**<br>विद्यार्थ्यांना आहे तसे स्विकारणे.<br>विद्यार्थ्यांना समजावून घेणे.<br>मानसिकता समजावून घेणे.<br>आत्मविश्वास वाढविणे.<br>सामुदायीक जबाबदारी निर्माण करणे. | |

| | | |
|---|---|---|
| | **VII)** मानसिक व बौध्दिक विकास :-<br>कर्तव्य भावना.<br>कौटुंबिक वातावरण निर्माण करणे.<br>वाचन आवड.<br>विविध स्पर्धा आयोजन. | |
| | **VIII))** नविन उपक्रम राबविणे:-<br>सुप्त गुणांना वाव देणे.<br>व्यक्तीमत्व विकास साधणे.<br>काटकसर व बचत साधणे.<br>आरोग्य शिक्षण.<br>योजनांची माहीती देणे. | |
| | **(IX)** अशासकीय संस्थांची मदत घेणे. | |
| | **(X)** शिस्तपालन. | |
| | **(XI)** व्यक्तीमत्व विकास करणे:-<br>वर्तन निरीक्षण.<br>बौध्दिक प्रगती.<br>दोष दूर करणे.<br>व्यसने / सवयी यांच्यावर नियंत्रण ठेवणे. | |
| | **(XII)** आवश्यक कौशल्य अंगीकृत करणे:-<br>व्यवस्थापन .<br>संवाद .<br>गट व्यवस्थापन.<br>शैक्षणिक कौशल्याच्या पध्दती.<br>मुल्य शिक्षण. | |
| **३** | सामान्य अध्ययन - जागतिक तसेच भारतातील चालू घडामोडी.<br>राजकीय, औद्योगिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, भौगोलिक, खगोलशास्त्रीय, सांस्कृतिक, वैज्ञानिक इत्यादी. | **गुण २०** |
| **४** | सामान्य अध्ययन - बुध्दिमापन विषयक प्रश्न उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो याचा अंदाज घेण्याच्या दृष्टीने सदर प्रश्न विचारण्यात येतील. | **गुण २०** |

# सहायक आयुक्त, समाजकल्याण अधिकारी, गृहप्रमुख पदभरती– एकत्रित अभ्यासक्रम *

*(२००९, २०१०, २०१२, २०१३ परीक्षा पद्धतीनुसार)*

**(१) समाजकल्याण –**

१) **समाजकार्य –** इतिहास व तत्त्वज्ञान, समाजशास्त्र व अर्थशास्त्र
२) **मानवी अभिवृद्धी व व्यक्तिमत्व विकास –** व्यक्तिमत्व व सामाजिकरण
३) **भारतीय सामाजिक समस्या व उपाययोजना –** कारणे, वंचितांच्या ( स्त्रिया, मुले, युवक, वयोवृद्ध, दिव्यांग, कुटुंब) समस्या व सामाजिक कायदे
४) **समाजकल्याण प्रशासन –** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील धोरणे, शासकीय व अशासकीय संघटनांचे कार्यक्रम व सेवा.
५) **सामाजिक सुरक्षा कायदे – (**पीसीआर, पीओए, बालकामगार)
६) **सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका** व स्वयंसेवी संस्थांचे योगदान व हस्तक्षेप

**(२) सामान्य अध्ययन –**

७) इतिहास
८) भूगोल, लोकसमुदाय व पर्यावरण
९) राज्यव्यवस्था, शासन, राजनीती व स्थानिक प्रशासन
१०) अर्थव्यवस्था
११) विज्ञान
१२) चालू घडामोडी

**(३) गृहप्रमुख पद –**

१३) अध्यापन अभियोग्यता
१४) संशोधन अभियोग्यता
१५) वाचन आकलन , आधारसामग्री अर्थउकल
१६) संप्रेषण, माहिती व संज्ञापन तंत्रज्ञान
१७) उच्च शिक्षण पद्धती
१८) गृहविज्ञान –पोषक आहार, उपचारशास्त्रीय अन्न
१९) प्रशासकीय नियम व सुविधा– वसतिगृहांचे उद्देश, प्रशासकीय जबाबदारी, आर्थिक बाबी, सोयीसुविधा पुरवठा, पर्यवेक्षण, पालकत्त्व, शिस्तपालन
२०) मानसिक, बौद्धिक, व्यक्तिमत्व व कौशल्य विकासातील भूमिका, नवीन उपक्रम

**(४) बुद्धिमापन विषयक प्रश्न –**

## समाजकल्याण खात्यातील अधिकारी परीक्षेसाठी उपयुक्त प्रश्नसंच

# समाजकल्याण, विषयज्ञान व सामान्य अध्ययन

१) **समाजकार्य –** इतिहास व तत्त्वज्ञान, समाजशास्त्र व अर्थशास्त्र
२) **मानवी अभिवृद्धी व व्यक्तिमत्व विकास –** व्यक्तिमत्व व सामाजिकरण
३) **भारतीय सामाजिक समस्या व उपाययोजना –** कारणे, वंचितांच्या ( स्त्रिया, मुले, युवक, वयोवृद्ध, दिव्यांग, कुटुंब) समस्या व सामाजिक कायदे
४) **समाजकल्याण प्रशासन –** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील धोरणे, शासकीय व अशासकीय संघटनांचे कार्यक्रम व सेवा.
५) **सामाजिक सुरक्षा कायदे – (**पीसीआर, पीओए, बालकामगार)
६) **सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका** व स्वयंसेवी संस्थांचे योगदान व हस्तक्षेप
७) **इतिहास**
८) **भूगोल, लोकसमुदाय व पर्यावरण**
९) **राज्यव्यवस्था, शासन, राजनीती व स्थानिक प्रशासन**
१०) **अर्थव्यवस्था**
११) **विज्ञान**
१२) **चालू घडामोडी**
१३) **अध्यापन अभियोग्यता**
१४) **संशोधन अभियोग्यता**
१५) **वाचन आकलन , आधारसामग्री अर्थउकल**
१६) **संप्रेषण, माहिती व संज्ञापन तंत्रज्ञान**
१७) **उच्च शिक्षण पद्धती**
१८) **गृहविज्ञान –पोषक आहार, उपचारशास्त्रीय अन्न**
१९) **प्रशासकीय नियम व सुविधा– वसतिगृहांचे उद्देश, प्रशासकीय जबाबदारी, आर्थिक बाबी, सोयीसुविधा पुरवठा, पर्यवेक्षण, पालकत्त्व, शिस्तपालन**
२०) **मानसिक, बौद्धिक, व्यक्तिमत्व व कौशल्य विकासातील भूमिका, नवीन उपक्रम**

## (१) समाजकार्य – इतिहास व तत्त्वज्ञान, समाजशास्त्र व अर्थशास्त्र

१) समाजशास्त्राचे आद्यजनक कोण ?
१) एमिल डरखाईम २) हर्बर्ट स्पेन्सर ३) मॅक्स वेबर ४) ऑगस्ट कॉम्ट

२) मानव हा समाजशील प्राणी आहे (Man is a Social Animal) असे खालीलपैकी कोणी म्हटले?
१) रूसो २) कार्ल मार्क्स ३) ॲरिस्टॉटल ४) किंग्जले डेव्हिस

३) कुटुंब ही सामाजिक संस्था असून निश्चित मानवी गरजा भागविण्याच्या उद्देशाने तिची निर्मिती झाली आहे ही व्याख्या कोणाची ?
१) डी. एन. मुजुमदार  २) बील्स ॲन्ड होईझार  ३) मॅकआयव्हर व पेज  ४) इलियट व मेरिल

४) करिशमॅटिक अथॉरिटी (charismatic authority) या प्राधिकाराचे विश्लेषण कोणत्या समाजशास्त्राने केले?
१) कार्ल मार्क्स  २) सी. एच. कुले  ३) एमिल डरखाईम  ४) मॅक्स वेबर

५) आधुनिक समाजशास्त्र व सामाजिक मानसशास्त्राच्या विकासात भरीव योगदान आपल्या ''स्व आणि समाज'' (self and society) या सिद्धांताद्वारे देणारे समाजशास्त्रज्ञ कोणते?
१) चार्लस् हॉर्टन कुले  २) मॅक्स वेबर  ३) इमिल डुर्कहेम  ४) हर्बर्ट स्पेन्सर

६) गटांचे प्राथमिक गट व दुय्यम गट असे वर्गीकरण खालीलपैकी कोणी केले?
१) किंग्सले डेव्हिस  २) चार्लस् हॉर्टन कुले  ३) मॅक्स वेबर  ४) श्रीमती सुधा काळदात

७) जात हा बंदिस्त वर्ग आहे असे कोणत्या विचारवंताने म्हटले आहे ?
१) कार्ल मार्क्स  २) स्वामी विवेकानंद  ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर  ४) डॉ. जी. एस..घुर्ये

८) जोड्या लावा :

| | |
|---|---|
| अ) कोनोप्का | I) सोशल डायग्रॉसीस |
| ब) मेरी रिचमंड | II) कम्युनिटी ऑर्गनायझेशन |
| क) मुरे रॉस | III) ग्रुप वर्क इन चिल्ड्रेन इंस्टिट्युशन |
| ड) पॉलन यंग | IV) सायंटिफिक सोशल सर्व्हे ॲण्ड रिसर्च |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | I | III | IV | I |
| २) | IV | III | II | I |
| ३) | III | I | II | IV |
| ४) | I | III | IV | II |

९) समाजशास्त्र या सामाजिक विज्ञानात खालीलपैकी कोणत्या घटकाचे अध्ययन केले जाते ?
१) समूहातील आंतरक्रिया  २) सामाजिक संस्थांमधील आंतरसंबंध
३) विकास तसेच परिवर्तनाची प्रक्रिया  ४) वरील सर्व

१०) मॅक्स वेबर यांनी प्राधिकार (Authority) च्या प्रकारात खालीलपैकी कशाचा अंतर्भाव केलेला नाही?
१) विवेक व कायदेशीर प्राधिकार  २) पारंपरिक प्राधिकार
३) नियमबाह्य प्राधिकार  ४) करिश्मा प्राधिकार

११) मॅक्स वेबर यांच्या आयडियल टाइप चे/ चा प्रकार कोणते/कोणता –
अ) ऐतिहासिक विशिष्ट बाबी  ब) सामाजिक वास्तवाचे अमूर्त घटक
क) विशिष्ट प्रकारच्या वर्तनाची विवेकपूर्ण पुनर्निर्मिती  ड) वरील सर्व (अ), (ब), (क)

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ)   २) फक्त (ब)   ३) फक्त (अ) आणि (क)   ४) (ड)

१२) खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?

१) मॅक्स वेबर या समाजशास्त्राने धर्माची मीमांसा करताना , धर्म हा समाजजीवनास कसे वळण देतो आणि समाजजीवनातील अर्थ, काम इ. प्रेरणांवरही धर्माचा प्रभाव कशा रितीने दिसून येतो याचे विवेचन केले आहे.

२) मॅक्स वेबरचा धर्ममिमांसेचा दृष्टिकोन उत्क्रांतिवाद आहे.

३) मॅक्स वेबरच्या मते जगात असा कोणताही समाज अस्तित्वात नाही की जेथे अलौकिक शक्ती यासारख्या कल्पना आढळत नाहीत.

४) मॅक्स वेबरने धर्मासंबंधी काहीही विवेचन केलेले नाही. त्याने केवळ नोकरशाही अधिकार आणि सत्ता विवेचन केले आहे.

१३) प्राथमिक गटामध्ये कशा प्रकारचे संबंध असतात व सदस्यांमध्ये कशा प्रकारची भावना असते ?

१) अनौपचारिक संबंध असतात व परकेपणाची भावना असते.

२) औपचारिक संबंध असतात व आपलेपणाची भावना असते.

३) अनौपचारिक संबंध असतात व आपलेपणाची  भावना असते.

४) वरीलपैकी एकही नाही.

१४) प्राथमिक गटातील सदस्यामध्ये संबंध –

१) वरवरचे असतात   २) जिव्हाळ्याचे व अनौपचारिक असतात

३) औपचारिक स्वरूपाचे असतात   ४) कृत्रिम स्वरूपाचे असतात

१५) समुदाय संघटन हे ........ आहे ........ नव्हे.

१) काम – हौस   २) साधन – साध्य   ३) साध्य – साधन   ४) विकास – संघटन

१६) माणसाचे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे व त्याचे समाजीकरण करण्याची महत्त्वाची जबाबदारी कोणावर असते?

१) प्रवास   २) पुस्तके   ३) व्यक्तिसंबंध   ४) कुटुंब

१७) प्रत्येक समाजाला ...... असतात/असते.

१) बंधने   २) नियम   ३) समाज रचना   ४) ओळख

१८) पश्चिमीकरणातील महत्त्वाचा गुणधर्म म्हणजे

१) राष्ट्रहितवाद   २) मानवहितवाद   ३) जमातवाद   ४) समाजवाद

१९) आधुनिकीकरणाची गती आणि दिशा कशी असते?

१) अधोमुख   २) सरळ   ३) वर्तुळाकार   ४) ऊर्ध्वमुख

२०) बहुसंस्कृतीवादाचे लक्षण कोणते ?

अ) विविधतेला मान्यता   ब) स्वातंत्र्य, समता व न्यायाचा हक्क

क) व्यक्तिवादाचा स्वीकार   ड) ज्यांचे अस्तित्व टिकते ते लायक

**पर्यायी उत्तरे :**

१) वरीलपैकी फक्त (अ) २) फक्त (ब) ३) फक्त (अ),(ब),(क) ४) फक्त (ड)

२१) मानव समाजात परिवर्तन खालील घटकाद्वारे निश्चित केले जाते –

अ) भौतिक ब) मानसिक क) आध्यात्मिक ड) शारीरिक

**पर्यायी उत्तरे :**

१) (अ), (ब) आणि (क) २) (अ), (क) आणि (ड)

३) (अ), (ब), (क) आणि (ड) ४) (ब), (क) आणि (ड)

२२) प्रख्यात मराठी लेखक भालचंद्र नेमाडे कोणत्या विचारधारेचे प्रतिनिधित्व करतात?

१) प्रादेशिकतावाद २) हिंदुत्ववाद ३) देशीवाद ४) स्वच्छंदतावाद

२३) रिकामी जागा भरा. सर्वांचे सर्व कल्याण म्हणजे .......... होय.

१) समाजविकास २) समाजकल्याण ३) सर्वोदय ४) समाजकार्य

२४) कल्याणकारी अर्थशास्त्राचे जनक कोणाला मानले जाते ?

१) प्रो. ए. सी. पीगू २) कौटिल्य ३) कार्ल मार्क्स ४) वि. म. दांडेकर

२५) मानव विकास निर्देशांकाची संकल्पना कोणी मांडली ?

१) डॉ. मेहबूब उल हक आणि डॉ. अमर्त्य सेन २) पी. चिदंबरम् आणि यशवंत सिन्हा

३) डॉ. मनमोहन सिंग व नरसिंहराव ४) वरीलपैकी कोणीही नाही

२६) रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा.

कल्याणकारी अर्थशास्त्रातील विवेचनाच्या मुळाशी ........ निर्णय असतात.

१) स्वयं २) सामाजिक ३) आर्थिक ४) नैतिक

## (२) मानवी अभिवृद्धी व व्यक्तिमत्व विकास – व्यक्तिमत्व व सामाजीकरण

१) गर्भधारणेपासून जन्मापर्यंत असलेली अवस्था अंदाजे .................. दिवसाची असते.

१) २०० ते २२५ २) २७० ते २८० ३) ३०० ते ३१० ४) २२५ ते २४०

२) उत्तर बाल्यावस्थेचा वयोगट सर्वसाधारणपणे कोणता असतो ?

१) १३ ते १६ वर्षे २) १० ते १५ वर्षे ३) ०१ ते ०५ वर्षे ४) ०६ ते १२ वर्षे

३) वातपित्त व कफ या धातुतत्त्वावर व भारतीय तत्त्वज्ञानावर आधारित व्यक्तिमत्त्वाचे किती प्रकारात वर्गीकरण करता येते ?

१) ६ २) ९ ३) ३ ४) ४

४) सहउद्‌बोधनाची कल्पना ...... यांनी मांडली.

१) वॉरन विव्हर २) प्रो. शॅनॉन ३) फिलिप लेविस ४) थिओडोर एम. न्यूकोम

५) बुद्धीचे सामाजिक बुद्धी, अमूर्त बुद्धी असे प्रकार खालीलपैकी कोणी मांडले?
१) ई.एल.थॉर्नडाइक २) गार्डनर ३) रेमंड कॅटेल ४) स्टेन बर्ग

६) व्यक्तिगत विकासातील, आठ पेचप्रसंग युक्त मनोसामाजिक सिद्धांत खालीलपैकी कोणी मांडला ?
१) सिगमड फ्रॉईड २) एरिक एरिकसन ३) जीन पीजे ४) कोहलबर्ग

७) व्यक्ती विकासाचा मनोविश्लेषण सिद्धांत खालीलपैकी कोणी मांडला ?
१) क्रेइमर २) शेल्डन ३) सिगमंड फ्रॉईड ४) वरीलपैकी कोणीही

८) ओरल, ॲनल, लॅटन्सी, फॅलिक व जेनिटल ही विकासाच्या अवस्थांची नावे देणारा शास्त्रज्ञ कोण ?
१) थॉर्नडाईक २) पेज ३) फ्रॉईड ४) ॲडलर

९) सिगमंड फ्रॉईड यांनी मांडलेल्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या अवस्था कोणत्या ?
१) वेदन–कारक अवस्था–पूर्व संकल्पना काळ–भरीव कार्यान्वयन काळ
२) पूर्व नैतिक स्तर–नैतिक विकास–मान्यता व मदत–सामाजिक दायित्व
३) मुखावस्था–उत्सर्जन अवस्था–लैंगिक अवस्था सुप्तकाळ – पुनरुत्पादक काळ
४) अनुकरण – सामाजिक अनुसरण – आज्ञाधारकता

१०) फ्रॉईडच्या मते व्यक्तिमत्त्वाचे खालीलपैकी तीन घटक कोणते ?
१) मेंदू, शरीर, मन २) शरीर, वातावरण, कुटुंब ३) शाळा, कुटुंब, मित्र ४) इदम्, अहम्, पराहम्

११) व्यक्तिमत्त्व विकासाकरिता फ्रॉईड यांनी कोणत्या अवस्था सांगितल्या आहेत ?
१) बाह्य, कुमार, प्रौढ व वृद्धावस्था २) मौखिक, उत्सर्जन, लैंगिक व सुप्तकाळ पुनरुत्पादकावस्था
३) गर्भ, पौगंड, सुप्त व वृद्धावस्था ४) वर नमूद (२) व (३) बरोबर आहे.

१२) ब्रॉन फ्रेन यांच्या मते, व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम करणाऱ्या पर्यावरणाच्या स्तरामध्ये, खालीलपैकी कशाचा अंतर्भाव नाही ?
१) सुक्ष्मयंत्रणा २) मध्यमयंत्रणा ३) बाह्ययंत्रणा ४) आनुवंशिक यंत्रणा

१३) एच. स्पेन्सर यांचा 'ग्रेटर हॅपीनेस' संकल्पनेनुसार ...........
१) व्यक्तीची इच्छा नेहमी जास्त सुख मिळविण्याची असते.
२) व्यक्तीची इच्छा नेहमी जास्त फायदा मिळविण्याची असते.
३) व्यक्तीची इच्छा नेहमी जास्त जबाबदारी घेण्याची असते.
४) व्यक्तीची इच्छा नेहमी जबाबदारीतून मुक्त होण्याची असते.

१४) ऑटो रँक यांचा व्यक्तिमत्त्वाचा सिद्धांत कोणता ?
१) विकास २) जागृती ३) जाणीव ४) स्व

१५) रँक यांच्या मते व्यक्तिमत्त्व विकास म्हणजे काय ?
१) व्यक्ती विकास प्रक्रिया
२) व्यक्तीचा सामाजिक व आर्थिक विकास
३) व्यक्तीचा शारीरिक विकास
४) स्वजागृती व स्वजाणीवेची प्रक्रिया

१६) मानसशास्त्रज्ञ 'रोर्शाचे' शाई निर्मित डाग कुठल्या चाचणीशी संबंधित आहे ?
१) मानवी प्रेरणा संघर्ष
२) व्यक्तिमत्त्व
३) वर्जन – वर्जन संघर्ष
४) बुद्धिमत्ता

१७) स्वतःला ओळखण्याकरिता, स्वतःत सुधारणा घडविण्यासाठी व स्वतःचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी व्यक्तीने समाजाकडे पाहावे. सी. एच. कुलेच्या या सिद्धांताचे नाव काय ?
१) सोशल फॅक्टर सिद्धांत
२) लुकिंग ग्लास सेल्फ सिद्धांत
३) कोड ऑफ एथिक्स
४) बिहेविअर सिद्धांत

१८) सी. एच. कुले यांनी व्यक्ती व समाज यांच्या संबंधाबाबतीत कोणता सिद्धांत मांडला आहे ?
१) सकारात्मक सिद्धांत
२) फेस टू फेस
३) लुकिंग ग्लास सेल्फ थिअरी
४) सोशल फॅक्टर थिअरी

१९) मनोविश्लेषणवादी कार्ल युंग याने वर्तनावर आधारीत व्यक्तिमत्त्वाचे खालीलप्रमाणे कोणते प्रकार सांगितले आहेत?
१) मेदोदेहिता, स्नायुप्रधान देहिता, अस्थिप्रधान देहिता
२) अंतर्मुख, बहिर्मुख
३) हट्टी, परावलंबी
४) भित्री, चिडखोर

२०) व्यक्तीच्या विकासाचे तत्त्व हे ...... आहे.
१) विकासाचा विशिष्ट क्रम व दिशा
२) आकारमानातील बदल
३) प्रमाणातील बदल
४) रचनात्मक वाढ व विकास

२१) वापरातील संज्ञा निवडा.
सुखदस्मृतींना उजाळा देण्याच्या प्रक्रियेसाठी मनोवैज्ञानिक कोणती संज्ञा वापरतात ?
१) परागमन
२) दमन
३) समर्थन
४) प्रतिपूरण

२२) पुढील अवस्थांपैकी कोणती अवस्था विकृत व्यक्तिमत्त्वाची आहे ?
१) वार्धक्यजन्य मनोदुर्बलता
२) विषण्णमनस्कता
३) मद्यातिरेक जन्म विकृती
४) अपस्मारातील मनोविकृती

२३) मानसिक विकृतीच्या उपचार पद्धतींपैकी आंतरव्यक्ती उपचार पद्धतीत खालीलपैकी कोणत्या उपचार पद्धतीचा समावेश होतो ?
१) कुटुंब उपचार पद्धती
२) क्लाएंट सेंटर्ड थेरपी
३) गेस्टाल्ट
४) क्रायसिस थेरपी

२४) मानसशास्त्र व्यक्ती व तिचे वर्णन समजून घेते, तर समाजकार्य हे –
(खालीलपैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.)
१) व्यक्तीला मदत करते
२) वागणूक अभ्यासते
३) मानवी वर्तमानाच्या मनो–सामाजिक बाजूच्या संदर्भात काम करते
४) सल्ला देते

२५) व्यक्तीची बुद्धिमत्ता, जाणीवावस्था व शारीरिक क्रियांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता यामध्ये आत्यंतिक बिघाड होणारा आल्झायमर हा रोग कोणत्या अवस्थेत होतो ?
१) बाल्यावस्था २) कुमारावस्था ३) प्रौढावस्था ४) वृद्धावस्था

२६) आनुवंशिक गुणधर्म हे ............ वेळी एकदाच व कायमचे निश्चित होतात.
१) जन्माचे वेळी २) जन्मानंतर ३) गर्भधारणेच्या वेळी ४) गर्भधारणेनंतर

२७) मानवी व्यक्तिमत्त्व मापनाच्या कोणत्या पद्धती होय ?
१) संस्कृती व समाज पद्धती २ ४) कुटुंब, शेजार व शाळा पद्धती
३) मुलाखत, पदनिश्चय व प्रश्नावली पद्धती ४) शरीरयष्टी व अंतःस्त्राव ग्रंथी पद्धती

२८) शारीरिक परिवर्तन, आत्मचेतना, काम चेतनेत वाढ, आदर्शवाद विरुद्ध वास्तववाद, समवयस्क संबंध इ. खालीलपैकी मानवी विकासाचा कोणता टप्पा अधोरेखित करतात?
१) बाल्यावस्था २) किशोरावस्था ३) प्रौढावस्था ४) वरील १, २ व ३

२९) खालीलपैकी प्रामुख्याने माणसाचे व्यक्तिमत्त्व कोण घडवितो?
१) सवयी २) परिवेश ३) वर्तन ४) स्वभाव

३०) व्यक्ती समाजात कसे जीवन जगेल याची निश्चिती कोण करते?
१) मित्र २) कुटुंब २) संस्था ४) वरीलपैकी कोणीही नाही

३१) व्यक्तिमत्त्वात व्यक्तीचे ...... याचा अंतर्भाव असतो.
१) सामाजिक संबंध २) नातेसंबंध ३) धर्म व जात ४) विचार–भावना

३२) ऑलपोर्टच्या नवीन सुधारित व्याख्येनुसार व्यक्तीचे वैशिष्ट्यपूर्ण वर्तन व विचार निर्धारित करणारे, तिच्या अंतर्गत असणारे ...... संस्थांचे गतिशील संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.
१) मानसिक २) बौद्धिक ३) शारीरिक ४) मानसजैविक

३३) विचार, कल्पनाशक्ती, स्मरण, एकात्मता व सामान्यीकरण यांच्या विकासासाठी खालीलपैकी कोणती शब्दयोजना केली जाते?
१) शारीरिक विकास २) भावनात्मक विकास ३) बौद्धिक विकास ४) नैतिक विकास

३४) शैशवास्थेच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान चूक आहे ?
१) शैशवावस्था हा विकासाचा पाया आहे २) शैशवावस्था परावलंबन कमी करणारी असते.
३) शैशवावस्थेत सामाजीकरणाची सुरुवात होते. ४) शैशवावस्था हे टोळीवय होय.

३५) रिकाम्या जागा योग्य पर्यायाने भरा.
ज्या व्यक्ती .......... दु:खी असतात त्या मोठेपणी दु:खी होण्याची शक्यता अधिक असते.
१) बाल्यावस्थेत २) किशोरावस्थेत ३) तारुण्यावस्थेत ४) पौगंडावस्थेत

३६) उत्तर बाल्यावस्था ही कोणत्या वैशिष्ट्यांनी ओळखली जाते ?

अ) बेजबाबदारपणा – भांडणे
ब) हे प्राथमिक शाळा वय असते.
क) हे टोळी वय असते
ड) ही प्रौढत्वाची सीमारेषा असते

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ) २) फक्त (अ), (क) ३) फक्त (अ), (ब), (क) ४) फक्त (ड)

३७) रिकामी जागा सुयोग्य शब्दाने भरा.

'स्व' हा जीवनाचा गाभा असून व्यक्ती नेहमी 'स्व' ला ........ ठेवण्याचा प्रयत्न करते.

१) मनात २) जागृत ३) विकसित ४) केंद्रस्थानी

३८) रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा.

जेव्हा व्यक्ती सामाजिक संस्थांच्या नियंत्रणाचा विरोध करते आणि लोकनीती, चालीरीती, परंपरा यांची अवहेलना करते तेव्हा ........ विसंघटन घडून येते.

१) सामाजिक २) सामुदायिक ३) वैयक्तिक ४) कौटुंबिक

३९) रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा. व्यक्ती मोठेपणी किती यशस्वीपणे .......... करेल ते लहान वयात प्रस्थापित होणारे वर्तनप्रकार, सवयी व अभिवृत्ती इत्यादींवरून ठरविले जाते.

१) कार्य २) समायोजन ३) नियोजन ४) प्रगती

४०) व्यक्ती साहाय्य कार्य मानव व त्याच्या सभोवतालचे वातावरण यांच्यात काय साधते ?

१) संबंध २) सामंजस्य ३) दुवा ४) समतोल

४१) रिकामी जागा सुयोग्य पर्यायाने भरा.

अर्भकावस्थेचे कार्य म्हणजे अर्भकाने ........ विषयी मूलभूत ज्ञान विकसित करणे होय.

१) विश्वास २) जन्म ३) पंचेंद्रिये ४) विकास

४२) अध्ययन, तर्कप्रक्रिया, विचार व भाषा ही मानवी विकासाचे कोणते अंग दर्शवितात ?

१) भावनिक विकास
२) व्यक्तिमत्त्व आणि सामाजिक विकास
३) बौद्धिक विकास
४) शारीरिक विकास

४३) रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा. आईवडिलांकडून संक्रमित होणारे वंशाणु पुढच्या पिढीतील बालकाची शारीरिक व मानसिक ........ निश्चित करतात.

१) स्थिती २) विकास ३) गुणधर्म ४) प्रगती

## (३) भारतीय सामाजिक समस्या व उपाययोजना, सामाजिक विकास उपक्रम

१) जगभरातील कुपोषित व्यक्तींची संख्या २००७ सालच्या ९२३ मिलियन वरून २००८ साली ........... मिलियनपर्यंत पोहोचली आहे.

१) ९६३ मिलीयन २) १०६३ मिलीयन ३) ११६३ मिलीयन ४) १२६३ मिलीयन

२) शेतकऱ्यांच्या सर्वांत जास्त आत्महत्या कोणत्या जिल्ह्यात झाल्या ?
१) भंडारा २) सोलापूर ३) यवतमाळ ४) गडचिरोली

३) समाजशास्त्र सामाजिक समस्यांचे ............... करते.
१) नोंद २) विश्लेषण ३) निराकरण ४) उपाय

४) एका बाजूला श्रीमंती व पैसा, तर दुसरीकडे दारिद्य्र व उपासमार यालाच ...................... म्हणतात.
१) गरिबी २) समाज ३) समुदाय ४) विषमता

५) वर्षानुवर्षे ज्यांना सामाजिक विषमतेचे चटके बसले त्यांच्या उत्थानासाठी 'विशेष' काही करणे म्हणजे भेदभाव करणे किंवा इतरांना भेदभावपूर्वक वागणूक देणे नव्हे. हा .................. भेदभाव असतो.
१) सकारात्मक भेदभाव २) नकारात्मक भेदभाव ३) अनावश्यक भेदभाव ४) अन्याय करणारा भेदभाव

६) सामाजिक विघटनामुळे ...................... उद्‌भवतात.
१) सामाजिक अन्याय २) सामाजिक समता ३) सामाजिक समस्या ४) सामाजिक शांतता

७) सेल्डन बेकनच्या मते मद्यपान ही ...... आहे.
१) सवय २) गरज ३) देणगी ४) व्याधी

८) गुन्ह्या संदर्भात बर्ट यांनी १९२५ साली ................. सिद्धान्त मांडला.
१) समाजशास्त्रीय २) जैवकीय ३) सोशॅलिस्ट ४) बहुकारकवादी

९) बालगुन्हेगारीची वाढ होण्यात कोणता घटक कारणीभूत आहे?
१) शिक्षण २) कुटुंब ३) आई ४) वडील

१०) आधुनिक काळात ...... सामाजिक संकट मानले जाते.
१) औद्योगिकरणास २) शहरीकरणास ३) बेकारीस ४) नोकरशाहीस

११) ''वेश्याव्यवसायातील ४३% मुली या अल्पवयीन असतानाच या धंद्यात त्यांना प्रवेश करावा लागतो. याचे प्रमुख कारण म्हणजे ...... होय.'' असे राष्ट्रीय महिला आयोगाने आपल्या ताज्या अहवालात म्हटले आहे.
१) बेरोजगारी व हिंसा २) हिंसा व उपासमार
३) उपासमार व दारिद्र्य ४) बेरोजगारी व कुटुंब विघटन

१२) वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांसाठी सध्या नवीन संज्ञा प्रचलित होत आहे.
१) देहव्यापार पीडित २) देहव्यापार शोषित ३) देहविक्री करणारी महिला ४) देहव्यापार करणारी स्त्री

१३) वृद्धावस्था ही व्याधी नाही पण वृद्धावस्थेच्या अनुषंगाने अनेक ...... उद्‌भवलेल्या दिसतात.
१) चिंता २) जबाबदाऱ्या ३) व्याधी ४) दशा

१४) पुढीलपैकी कोणती बाब लोकसंख्यावाढीला जबाबदार *नाही* ?
१) लोकांमध्ये अज्ञान
२) लोक शिक्षित झाले
३) आरोग्याच्या सोयी उपलब्ध
४) पुरुष प्रधान संस्कृती

## सामाजिक समस्येवरील उपाययोजना व विकास उपक्रम

१) भारतामध्ये खालीलपैकी कशाची मोठी परंपरा आहे ?
१) समाजसेवेची
२) व्यावसायिक समाजकार्याची
३) समाजकल्याण प्रशासनाची
४) कामगार कल्याणाची

२) 'ऑक्युपाय' या आंतरराष्ट्रीय सामाजिक चळवळीचा रोख कोणत्या समस्येवर आहे?
१) असमानता
२) मूलतत्त्ववाद
३) वंशवाद
४) नववसाहतवाद

३) भारतात कोणत्या सालापासून सामुदायिक विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला?
१) १९५२
२) १९५७
३) १९७८
४) वरीलपैकी कोणत्याही नाही

४) भारतात खुले कारागृहाचा पहिला प्रयोग .................. साली करण्यात आला.
१) १९३३
२) १९५५
३) १९५६
४) १९६०

५) महाराष्ट्रात कौटुंबिक न्यायालयाची स्थापना कोणत्या वर्षी झाली ?
१) १९७१
२) १९७६
३) १९८९
४) १९९४

६) कायद्याद्वारे महिलांचे सशक्तीकरण, आर्थिक कार्यक्रमाद्वारे सबलीकरण, शिक्षण, साक्षरता आणि आरोग्य ही उद्दिष्टे समोर ठेवून शासनाने महिला धोरणाचा नवीन आराखडा कोणत्या साली तयार केला ?
१) १९९४
२) १९९८
३) २०००
४) २००३

७) २०११ ते २०२० हे दशक संयुक्त राष्ट्र संघटनेने कोणत्या उद्दिष्टासाठी मुक्रर केले होते?
१) वसाहतवादाचे निर्मूलन
२) स्त्री-पुरुष समानता
३) एचआयव्ही-एड्सचे निर्मूलन
४) वांशिक समता

८) शिक्षणात मूलोद्योग हा विषय असावा अशी संकल्पना ...... यांनी मांडली.
१) महात्मा गांधी
२) महात्मा जोतिबा फुले
३) कर्मवीर भाऊराव पाटील
४) गुरुदेव रविंद्रनाथ टागोर

९) संसद व विधिमंडळामध्ये महिलांना आरक्षणाची तरतूद करणारे विधेयक 'विशेष संयुक्त समिती'कडे १९९६ साली सोपवण्यात आले होते. त्या समितीचे अध्यक्षपद भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या खालीलपैकी कोणा खासदाराकडे होते ?
१) कॉ. इंद्रजित गुप्ता
२) कॉ. अमरजित कौर
३) कॉ. गुरुदास दासगुप्ता
४) कॉ. गीता मुखर्जी

१०) महाराष्ट्र शासनाने सन २००६-०७ या वर्षापासून ''दलितवस्ती विकास व सुधारणा अभियान'' याची कोणाच्या नावाने सुरुवात केली आहे ?

१) महात्मा गांधी, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर
२) डॉ. आंबेडकर, महात्मा फुले, गाडगे महाराज
३) शाहू, फुले, आंबेडकर
४) गाडगे महाराज, शाहू, फुले

११) महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेचे जनक खालीलपैकी कोणास मानले जाते?

१) यशवंतरावजी चव्हाण २) वसंतराव नाईक ३) वि. स. पागे ४) बाळासाहेब भारदे

१२) वनसंवर्धनातील समस्यांना वाचा फोडण्यासाठीच्या चिपको आंदोलनाचे प्रणेते .................. होत.

१) सुंदरलाल बहुगुणा २) मोहन धारिया ३) अण्णा हजारे ४) विनोबा भावे

१३) 'हिवरे बाजार' या आदर्श गावाशी संबंधित असणारी व्यक्ती कोणती ?

१) अण्णा हजारे २) बाबा आढाव ३) मेधाताई पाटकर ४) पोपटराव पवार

१४) मराठवाड्यात खुले कारागृह कुठे आहे ?

१) औरंगाबाद २) पैठण ३) लातूर ४) नांदेड

१५) म. गांधीजींच्या मते ...... हा निधर्मी व समानतेचा संदेश देणारा आहे.

१) सर्वोदय
२) ग्राम स्वराज्य
३) अहिंसा
४) वरीलपैकी कोणताही पर्याय योग्य नाही

१६) अस्पृश्यता निवारण, सांप्रदायिक एकता, दारूबंदी, नई तालीम इ. उद्देशाने प्रेरित चळवळ कोणती ?

१) श्रीनिकेतन २) अंत्योदय ३) सर्वोदय ४) ख्रिश्चन मिशन

१७) बाल गुन्हेगारांना सुधारण्यासाठी खालीलपैकी कोणती पद्धती वापरली जाते ?

अ) मानसोपचार ब) वर्तन उपचार क) कृती उपचार ड) शिक्षा

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ),(ब) २) फक्त (ब) ३) फक्त (अ),(ब),(क) ४) फक्त (ड)

१८) काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखालील ''कालेलकर कमिशन'' कशाशी संबंधित आहे ?

१) पंचायत राज सुधारणा निकष ठरविण्यासाठी
२) प्रशासकीय सुधारणा निकष ठरविण्यासाठी
३) आर्थिक सुधारणा निकष ठरविण्यासाठी
४) मागासलेपणा सुधारणा निकष ठरविण्यासाठी

१९) राष्ट्रीय सामाजिक मदत कार्यक्रम (एन.एस.ए.पी.) विस्तारीत करून त्यात .............. या योजनेचा समावेश करण्याचे केंद्र सरकारने ठरवले आहे.

१) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेन्शन योजना
२) प्रियदर्शिनी विधवा पेन्शन योजना
३) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना
४) ग्रामीण रोजगार हमी योजना

२०) भारतात कोणत्या सामाजिक साहाय्यता योजना राबविल्या जातात ?

अ) राष्ट्रीय वृद्धापकालीन निवृत्ती वेतन योजना
ब) कामगार राज्य विमा योजना
क) राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना
ड) राष्ट्रीय मातृत्व लाभ योजना

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ)
२) फक्त (ब)
३) फक्त (अ) आणि (ब)
४) फक्त (अ), (क) आणि (ड)

२१) बिहारमधील 'मुसाहर' नावाच्या दलित-अस्पृश्य समाजाच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी बिहार सरकारने खालीलपैकी कोणत्या प्रकल्पास मान्यता दिली आहे ?

१) उंदरांची शेती करणे, उंदरापासून मांस निर्माण करणे व मांसाची विक्री करण्याचा प्रकल्प
२) उंदरे मारून त्यापासून मांसाची छोट्या दुकानातून विक्री
३) उंदराचे मांस परदेशात पाठवण्याचा प्रयत्न
४) वरीलपैकी एकही नाही

२२) बालमजुरीच्या उच्चाटनासाठी हे पहिले पाऊल आहे.

१) सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण देऊन शिक्षणाचे सार्वत्रीकरण करणे.
२) बालमजुरी प्रतिबंध व नियमन कायद्यामध्ये दुरुस्ती करणे.
३) बालकांकडून मजुरी करून घेणाऱ्यास कडक शिक्षा करणे.
४) पालकांनीच त्यांना प्रतिबंध करणे.

२३) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय खालील शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या गटात सुरू करण्यात येते.

१) ज्या गटात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण ५०% पेक्षा कमी आहे.
२) ज्या गटात मुलींच्या शिक्षणातील गळतीचे प्रमाण ५०% पेक्षा जास्त आहे व मुले आणि मुली यांच्या गळतीमधील फरक राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे.
३) ज्या गटात स्त्री साक्षरता राष्ट्राच्या सरासरीपेक्षा कमी व स्त्री-पुरुष यांच्या साक्षरतेमधील फरक राष्ट्राच्या सरासरीपेक्षा जास्त आहे.
४) ज्या गटात मुलींच्या शिक्षणासाठी एकही शाळा अस्तित्वात नाही.

२४) पुढीलपैकी कोणते ध्येय सर्व शिक्षा अभियानात समाविष्ट नाही ?

१) सहा-चौदा वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षणाची हमी देणे
२) सहा-चौदा वयोगटातील मुलांना पुढे उच्च शिक्षणाची हमी देणे
३) प्राथमिक स्तरावर लिंग व सामाजिक भेद नाहीसा करणे
४) प्राथमिक स्तरावर दर्जेदार जीवनशिक्षणावर भर देणे

२५) जवाहर नवोदय विद्यालयांचा पुढीलपैकी कोणता हेतू नाही ?

१) ग्रामीण भागातील प्रज्ञावान मुलांना शिक्षणाच्या उत्तम संधी देणे
२) फक्त मुलींना उत्तम शिक्षणाची संधी उपलब्ध करणे
३) विद्यार्थ्यांना देशाच्या सांस्कृतिक वैविध्याचा प्रत्यक्ष अनुभवातून परिचय करून देणे
४) विद्यार्थ्यांना सहशिक्षणाची निवासी सोय उपलब्ध करणे

## (४) समाजकल्याण प्रशासन – धोरणे, शासकीय व अशासकीय संघटनांचे कार्यक्रम व सेवा

१) सामाजिक धोरण (सोशल पॉलिसी) म्हणजे –
 १) सामाजिक विकासाचा आराखडा
 २) विविध सहकारी धोरण
 ३) समाज विकासासाठी असलेल्या आर्थिक तरतुदींचा आराखडा
 ४) समाज विकासाची उद्दिष्ट्ये, साध्य व साधन याबाबतचे धोरण

२) समाजकल्याण प्रशासनाचे तत्त्वज्ञान कशावर आधारित आहे?
 १) मानवतावाद  २) संपत्तीविषयक स्वातंत्र्य व सुरक्षितता
 ३) आदर्शवाद  ४) निर्हस्तक्षेपाचा सिद्धांत

३) समाजकल्याण प्रशासन म्हणजे विशिष्ट व्यावसायिक कौशल्ये वापरून....रूपांतर सामाजिक करणे होय.
 १) शासकीय योजनेचे  २) स्वयंसेवी संस्थांच्या योजनेचे
 ३) खाजगी योजनेचे  ४) सामाजिक धोरणाचे

४) रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा.
सामाजिक कल्याण प्रशासन म्हणजे प्रभावीपणे सेवा पुरविण्यासाठी आवश्यक ......... व ......... देणारी समाजकार्याची पद्धत आहे.
 १) तंत्र – तंत्रज्ञान  २) ज्ञान – कौशल्ये  ३) माहिती – अनुभव  ४) माहिती – काम

५) कल्याणकारी राज्याची ठळक कार्य कोणती ?
 १) सर्व घटक राज्यांना समान संधी  २) सामाजिक विमा, साहाय्य, शिक्षण आणि आरोग्य
 ३) अनुसूचित जन–जातींचा विचार  ४) समाजकार्याचा विकास

६) युनिसेफ (UNICEF) या बालकल्याण व महिला कल्याणाचे कार्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय निधीची स्थापना झाली ?
 १) १९१९  २) १९४५  ३) १९४८  ४) वरील कोणत्याही वर्षी नाही

७) केंद्रीय समाजकल्याण मंडळ ...... साली स्थापन झाले.
 १) १९५३  २) १९४७  ३) १९४८  ४) १९५०

८) जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| अ)सामाजिक सुरक्षा विभागाची स्थापना | I) ऑक्टोबर, १९९९ |
| ब) समाजकल्याण विभाग नामकरण | II) मे, १९९८ |
| क) सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालय नामकरण | III) जानेवारी, १९६६ |
| ड) जनजाती कार्य मंत्रालय | IV) जून, १९६४ |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(अ)** | **(ब)** | **(क)** | **(ड)** |
|---|---|---|---|---|
| १) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| २) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| ३) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| ४) | (ii) | (i) | (iii) | (iv) |

९) लोककार्यक्रम व ग्रामीण प्रोद्योगिकी परिषद (कपार्ट) या संस्थेची स्थापना कोणत्या वर्षी करण्यात आली ?
१) १९८६ २) १९८५ ३) १९७५ ४) १९८१

१०) राष्ट्रीय महिला आयोग कधी स्थापन झाला ?
१) १९९३ २) १९९० ३) १९९४ ४) १९८५

११) केंद्रीय समाजकल्याण मंडळाच्या सर्वसाधारण मंडळाचे (General Body) किती सदस्य असतात ?
१) १६ २) ४० ३) ५२ ४) ५६

१२) समाजकल्याण प्रशासनाच्या कार्याला अभिव्यक्त करण्यासाठी POSDCORB हे सूत्र कोणी दिले?
१) टालकोट पार्सन २) लूथर गुलिक ३) लियोनार्ड मलिक ४) एच्. बी. ट्रेकर

१३) केंद्रीय समाजकल्याण मंडळाच्या पहिल्या अध्यक्षा कोण होत्या ?
१) दुर्गाबाई भागवत २) विजयालक्ष्मी पंडित ३) दुर्गाबाई देशमुख ४) वत्सला देशमुख

१४) महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचे संचालनालय कुठे आहे ?
१) मुंबई २) पुणे ३) औरंगाबाद ४) नाशिक

१५) भारतात प्रथम कोठे १९२२ मध्ये बाल न्यायालय सुरू करण्यात आले?
१) मुंबई २) दिल्ली ३) कलकत्ता ४) चेन्नई

१६) केंद्रीय समाज कल्याण मंडळाचे कार्य ............
१) महिला व बालकल्याणासाठी कार्य करणाऱ्या गैरसरकारी संस्थांना प्रेरणा देणे
२) महिला संघटनांना नियमित करणे (रेग्युलेट)
३) सरकारी व गैरसरकारी संघटनांमध्ये शृंखला वाढवणे
४) राज्य आणि केंद्र सरकारच्या समाजकल्याण खात्यांमध्ये दुवा साधणे

१७) महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचा जिल्हा पातळीवरील प्रमुख अधिकारी कोण ?
१) समाजकल्याण निरीक्षक २) जिल्हा समाजकल्याण अधिकारी
३) समाजकल्याण अधिकारी वर्ग-२ ४) विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी वर्ग-१

१८) 'नेहरू युवा केंद्र' ला वित्तीय साहाय्यता कोण प्रदान करते ?
१) जिल्हा परिषद २) जिल्हा अधिकारी कार्यालय ३) महाराष्ट्र सरकार ४) केंद्र सरकार

१९) मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न जास्त असेल अशा विद्यार्थ्यास ..........
१) फक्त शैक्षणिक शुल्कात सवलत मिळते २) फक्त शिष्यवृत्ती देण्यात येते
३) दोन्हीही सवलती मिळतात ४) वरीलपैकी कोणतेही उत्तर बरोबर नाही

Study CIRCLE

२०) मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या प्रकल्प पूर्तीसाठी कोण अनुदान देते ?
१) सामाजिक न्याय विभाग
२) गृहनिर्माण विभाग
३) नागरी विकास विभाग
४) महिला व बालकल्याण विभाग

२१) केंद्रीय समाजकल्याण मंडळाची स्थापना कशासाठी करण्यात आली ?
अ) राज्य व केंद्र सरकारच्या समाजकल्याणामध्ये दुवा साधणे.
ब) अनुदानित संस्थांच्या प्रकल्प व कार्यक्रमाचे मूल्यांकन करणे.
क) सर्वेक्षणाच्या माध्यमातून समाजकल्याण संस्थांच्या आवश्यकतांची गरज शोधणे.
ड) समाजकार्यातील प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.
**पर्यायी उत्तरे :**
१) (अ), (ब) आणि (ड)
२) (ब), (क) आणि (ड)
३) (अ), (ब) आणि (क)
४) (अ), (ब), (क) आणि (ड)

२२) प्रशासनाचा वापर समुदायाच्या कल्याणाचे व ध्येयपूर्तीसाठी काय म्हणून केला जातो ?
१) साधन
२) मदत
३) साहाय्यक
४) पूरक

२३) राज्य समाजकल्याण सल्लागार मंडळाच्या सदस्यांची नियुक्ती कोण करते ?
१) संबंधित राज्य
२) केंद्र सरकार
३) राज्य सरकार आणि केंद्रीय समाजकल्याण मंडळ (५०% – ५०%)
४) केंद्रीय समाजकल्याण मंडळ

२४) रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा.
१९५० च्या दशका दरम्यान ...... पाठिंब्याने कुटुंब नियोजन कार्यक्रम सुरू करणारा भारत पहिला देश
१) लोकांच्या
२) स्वयंसेवी संस्थांच्या
३) जागतिक बँकेच्या
४) शासनाच्या

२५) अन्नपूर्णा योजनेबाबतची माहिती ................. पुरविते.
१) जिल्हा परिषद
२) ग्राम पंचायत
३) राज्य सरकार
४) केंद्र सरकार

२६) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची स्थापना महाराष्ट्र शासनाने कोणत्या अधिनियमा अंतर्गत, १० जुलै १९७८ रोजी केली ?
१) सहकार अधिनियम
२) कंपनी कायदा अधिनियम १९५६
३) धर्मादाय अधिनियम
४) माहिती अधिकार अधिनियम

२७) महाराष्ट्रात अनुसूचित जातीतील अल्पभूधारक, त्याचप्रमाणे कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबलीकरण योजनेतील लाभार्थींना जमीन कसण्यासाठी १००% अनुदानावर कशाचा पुरवठा होतो ?
१) पॉवर टिलर
२) ट्रॅक्टर
३) टेम्पो
४) बैलजोडी

२८) राज्य शासनाने आर्थिक शिस्त व सुयोग्य नियंत्रण येण्याच्या दृष्टीने सर्व विभागामध्ये संगणकीय बी. डी. एस. विकसित केले आहे, बी. डी. एस. म्हणजे काय ?
१) बजेट डिस्ट्रीब्यूशन स्कीम
२) बजेट डिसबर्समेंट स्कीम
३) बजेट डिसबर्समेंट सिस्टिम
४) बजेट डिस्ट्रीब्यूशन सिस्टिम

# (५) सामाजिक सुरक्षा कायदे – (पीसीआर, पीओए, बालकामगार)

१) समाजव्यवस्था टिकविण्यासाठी तसेच समाजातील मानवसंस्थांची व मानवशक्तीची वाढ करण्यासाठी व टिकवण्यासाठी कोण/काय कार्य करते ?
१) समाजकार्य २) सामाजिक चळवळ ३) समाजसुधारक ४) सामाजिक कायदे

२) बालविवाह प्रतिबंधक कायदा खालीलपैकी कोणत्या साली पारित करण्यात आला?
१) १९२९ २) १९४८ ३) १९६१ ४) वरीलपैकी कोणत्याही नाही

३) कर्मचारी राज्य विमा कायदा (ESI Act) किती साली अस्तित्वात आला?
१) १९४७ २) १९५० ३) १९४९ ४) १९४८

४) संविधानातील १५ व्या कलमातील तरतुदी लागू करता याव्यात म्हणून केंद्र सरकारने ''अस्पृश्यता अपराध अधिनियम'' मंजूर केला आणि तो कायद्याच्या स्वरूपात १ जून ...... पासून लागू करण्यात आला.
१) १९४८ २) १९५५ ३) १९५० ४) १९४९

५) भारतीय सुधार शाळा कायदा कोणत्या साली पारित करण्यात आला?
१) १८९७ २) १८८१ ३) १९३० ४) वरीलपैकी कोणत्याही नाही

६) भारतात कौटुंबिक छळापासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा केव्हापासून अमलात आला ?
१) २००६ २) २००५ ३) २००७ ४) २००८

७) बाल लैंगिक शोषणाविरुद्धचा 'द प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन अगेन्स्ट सेक्शुअल ऑफेन्सेस', हा कायदा संसदेत केव्हा संमत झाला ?
१) २००७ २) २००५ ३) २००६ ४) २०१२

८) कारखाना कायदा १९४८ कलम ६७ नुसार .......... वर्षाखालील मुलांना कारखान्यात कामावर ठेवण्यास मनाई केली आहे.
१) १६ २) १२ ३) १४ ४) १८

९) बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) कायदा, १९८६ नुसार खालीलपैकी कोणते वय वर्ष पूर्ण न केलेल्या व्यक्तीस बालक समजले जाते ?
१) २१ वर्षे २) १६ वर्षे ३) १५ वर्षे ४) १४ वर्षे

१०) बालमजूर (प्रतिबंध व नियमन) कायदा १९८६ नुसार ...... वर्षाखालील मुला-मुलींना विविध उद्योग धंद्यामध्ये काम करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.
१) १२ वर्षांखालील २) १४ वर्षांखालील ३) १६ वर्षांखालील ४) १८ वर्षांखालील

११) मानवी अपव्यापार प्रतिबंध आणि जबरी श्रम व शोषण विरोधात भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदात तरतूद केली आहे?
१) अनुच्छेद १७ २) अनुच्छेद २३ ३) अनुच्छेद २४ ४) अनुच्छेद ४५

१२) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ नुसार महाराष्ट्रात शिक्षा ठोठाविले जाण्याचे प्रमाण खालीलपैकी किती टक्के आहे?
१)५०% पेक्षा अधिक २) २० ते ३०% पर्यंत ३) १० ते २०% ४) १०% पेक्षा कमी

१३) राज्य कामगार विमा कायदा १९४८ नुसार कामगारांना आरोग्य विमा व ...... फायदे मिळतात.
१) पदोन्नतीचे २) सामाजिक ३) वैद्यकीय ४) नोकरीचे

१४) नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ नुसार खालीलपैकी कोणास संरक्षक तरतुदी लागू होतात?
१) अल्पसंख्याक जातीची व्यक्ती २) अनुसूचित जमातीची व्यक्ती
३) अनुसूचित जातीची व्यक्ती ४) वरीलपैकी २ व ३

१५) नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५ नुसार खालीलपैकी कोणत्या कृत्यासाठी वैध कारवाई करता येत नाही?
१) धार्मिक नि:समर्थता लादणे.
२) लोकसेवकाने अपराधास अपप्रेरणा दिल्याच्या अभिकथनास शासनाची पूर्वसंमती न घेता आरोप करणे.
३) सामाजिक नि:समर्थता लादणे.
४) धार्मिक, वैचारिक अशा कोणत्याही कारणाने अस्पृश्यता पालनाचे समर्थन करणे.

१६) अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा, १९५६ नुसार खालीलपैकी कोणत्या कृत्यासाठी स्त्री अपराध्यास कारावासाऐवजी सुधारगृहात दाखल करता येईल ?
१) कुंटणखाना चालविणे
२) वेश्या व्यवसायाच्या उत्पन्नावर उपजीविका करणे.
३) अनैतिक व्यापाराच्या उद्देशाने व्यक्तीला डांबणे.
४) वेश्यावृत्तीच्या प्रयोजनाने सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव करणे.

१७) वेठबिगारी (उच्चाटन) कायदा, १९७६ चे उद्देश काय होते ?
अ) वेठबिगारी मजुरांना ओळखणे ब) वेठबिगारींची सुटका करणे.
क) जबरी संमतिपत्र लादणाऱ्या गुन्हेगारांना शिक्षा करणे ड) दक्षता समित्यांच्या नियमित बैठका घेणे.
**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त (अ), (ब) २) फक्त (ब), (क)
३) फक्त (अ), (ब), (क) ४) वरील सर्व (अ), (ब), (क), (ड)

१८) बाल न्याय कायदा १९८६ ने कोणती तरतूद केली आहे ?
अ) बाल कल्याण मंडळ ब) बाल न्यायालय
क) बाल मार्गदर्शन चिकित्सालय ड) विशेष गृह
**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त (अ) २) फक्त (अ) आणि (ब)
३) फक्त (अ), (ब) आणि (ड) ४) फक्त (अ), (ब) आणि (क)

१९) सती जाण्याच्या कृत्यास प्रतिबंध कायदा, १९८७ नुसार आमरण तुरुंगवासाची शिक्षा खालीलपैकी कोणत्या अपराधासाठी होऊ शकते :

१) सती जाण्याचा प्रयत्न करणे

२) सती जाण्यास प्रवृत्त करणे.

३) सतीचा गौरव करणे.

४) जिल्हाधिकारी किंवा जिल्हा न्यायदंडाधिकारी यांच्या मनाई हुकुमाचा भंग करणे.

२०) महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५ नुसार कौटुंबिक हिंसाचारामध्ये ......... चा अंतर्भाव होतो ?

अ) पीडित व्यक्तीला किंवा तिच्या मानसिक व शारीरिक आरोग्याला हानी/इजा पोहोचविणे.

ब) पीडित व्यक्ती किंवा तिच्या नातेवाइकांना हुंडा किंवा इतर मालमत्तेसाठी सतावणे, हानी/इजा पोहोचविणे

क) पीडित व्यक्तीला प्रिय अशा कोणत्याही व्यक्तीला शारीरिक वेदना देण्याची धमकी देणे.

ड) सामाईक वापरातल्या घरामध्ये प्रवेश करण्यास निर्बंध आणणे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ) २) फक्त (ब)

३) फक्त (ड) ४) वरील सर्व (अ), (ब) (क) आणि (ड)

## (६) सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका व स्वयंसेवी संस्थांचे योगदान व हस्तक्षेप

१) राष्ट्रीय समाज कार्यकर्त्यांची संघटना (NASW) किती साली प्रस्थापित झाली?

१) १९५४ २) १९५५ ३) १९५६ ४) १९५७

२) इंडियन असोसिएशन ऑफ ट्रेनड् सोशल वर्कर्स (IATSW) ची स्थापना कोणत्या साली करण्यात आली?

१) १९६१ २) १९६३ ३) १९७१ ४) यांपैकी कोणतेही नाही

३) समाज कार्य हे कायदेशीर प्रवाहात किती सालापासून सामील झाले?

१) १९६८ २) १९६९ ३) १९७१ ४) १९७०

४) व्यावसायिक समाज कार्यकर्त्याची ''नीतिमूल्ये'' टाटा सामाजिक विज्ञान संस्थेने (TISS मुंबई) कोणत्या साली तयार केली?

१) १९९५ २) १९९६ ३) १९९७ ४) १९९८

५) व्यावसायिक समाजकार्याच्या किती पद्धती आहेत ?

१) ४ २) ५ ३) ६ ४) ७

६) व्यावसायिक समाजकार्याच्या व्यक्तींनी संस्थांगत परिस्थितीशी समायोजन साधणे आणि संस्थांगत परिस्थितीच्या क्षेत्रात योग्य बदल करणे हा दृष्टिकोन खालीलपैकी कोणी मांडला ?

१) मुरे रॉस २) हॅमिल्टन ३) बिस्नो ४) मेरी रिचमंड

७) महाराष्ट्रात समाजकार्याचे प्रशिक्षण देणारी पहिली संस्था कोणती ?
१) कर्वे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सर्व्हिस, पुणे
२) मातृसेवा संघ इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, नागपूर
३) टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई
४) समाजकार्य महाविद्यालय, औरंगाबाद

८) ''इंडियन जर्नल ऑफ सोशल वर्क'' हे मासिक कोणत्या संस्थेने सुरू केले?
१) निर्मला निकेतन, मुंबई
२) कर्वे सामाजिक संस्था, पुणे
३) समाज कार्य विभाग, लखनौ विद्यापीठ, लखनौ
४) टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई

९) भारतात व्यावसायिक सामाजिक कार्यकर्त्यांसाठी नीती उद्घोषणा कोणी केली ?
१) टाटा समाज विज्ञान संस्था शिक्षक मंच (TISSSWEF)
२) भारतातील समाज कार्य शाळांची संघटना (ASSWI)
३) विद्यापीठ अनुदान आयोग
४) वरीलपैकी कोणीही नाही

१०) समाजकार्य या आधुनिक शास्त्राची निर्मिती कोणत्या दोन शास्त्रातून झाली आहे ?
१) समाजशास्त्र व राज्यशास्त्र
२) समाजशास्त्र व अर्थशास्त्र
३) समाजशास्त्र व मानसशास्त्र
४) समाजशास्त्र व गृहअर्थशास्त्र

११) समाजशास्त्र समाजकार्यकर्त्याला ज्ञानाची बैठक देते, तर समाजकार्य ज्ञानाचा प्रत्यक्ष वापर करून समस्यांचे .................शोधते.
१) कारणे
२) समाधान
३) जाळे
४) परिणाम

१२) समाजकार्य पद्धतीचा अवलंब समाजशास्त्राच्या मदतीशिवाय शक्य नाही कारण ................
१) व्यक्तीच्या समस्येची मुळे स्पष्ट होतात
२) व्यक्तीच्या सामाजिकतेला आधार मिळतो
३) व्यक्ती वाईट प्रवृत्तीपासून दूर होते
४) व्यक्तीस सन्मानाने जगता येते

१३) समाजकार्यातील स्वयंनिर्णयाचे तत्त्व म्हणजे ....................
१) समाज कार्यकर्त्याने स्वतः निर्णय घेणे.
२) समस्याग्रस्त व्यक्तीने निर्णय घेणे.
३) समाजातील पुढाऱ्यांनी निर्णय घेणे.
४) सरकारी अधिकाऱ्यांनी निर्णय घेणे.

१४) समाजकार्य, समस्या सोडविण्यास .......... पुरवते.
१) शास्त्रशुद्ध मार्ग व साधने
२) पैसा व माणसे
३) सल्ला व मार्गदर्शन
४) विचार

१५) समाजकार्याचा मुख्य उद्देश म्हणजे व्यक्तीला ..................... बनविणे.
१) परावलंबी
२) स्वावलंबी
३) हुशार
४) चलाख

१६) समाजकार्याच्या तत्त्वानुसार समस्या असलेली व्यक्ती कलंकित ..................
१) मानली जाते
२) मानली जात नाही
३) केली जाते
४) होत असते

१७) समाजकार्य व्यक्ती स्वातंत्र्य व त्याच्या ...... यावर विश्वास ठेवते.
१) ज्ञान
२) अज्ञान
३) कृतिशील क्षमता
४) शक्ती

१८) खालीलपैकी सामाजिक कृतीचे तंत्र कोणते?
१) मौन धारण करणे
२) रणनीतीनुसार कायदेशीर लढा
३) राजकीय पक्ष स्थापन करणे
४) अफवा पसरविणे

१९) समाजसेवी संस्थांमध्ये जनसंपर्काचा सर्वात मोठा फायदा कोणता?
१) संस्थेच्या अडचणी सोडविणे
२) संस्थेमधील वाद मिटविणे
३) सकारात्मक जनमत तयार होणे
४) संस्थेमध्ये चांगले सेवक भरती करणे

२०) समाजसेवी संस्थांची यशाची किल्ली कोणती?
१) आर्थिक संपत्ती
२) समुदायाचा परिणामकारक आराखडा असणे
३) सभा घेणे
४) कार्यक्रम घेणे

२१) समाज कार्यातील स्त्रीवादाशी खालीलपैकी कोणती गोष्ट जुळत नाही?
१) समान अधिकाराचा पुरस्कार
२) निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग
३) आत्मशोधातून स्त्रियांचे सबलीकरण
४) जागतिकीकरणातून एकजिनसी समाजाची निर्मिती

२२) संशोधन समस्येचे पूर्व ज्ञानामुळे सुचलेले एक संभाव्य उत्तर किंवा स्पष्टीकरण म्हणून मांडण्यात आलेले विधान कोणते होय?
१) भाकीत
२) संशोधन
३) निरीक्षण
४) गृहीतकृत्य

२३) खालीलपैकी समाज कार्याचे कोणते तत्त्व अचूक नाही ?
१) सामाजिक वास्तवतेवर विश्वास
२) अशिलाचा आदर करणे.
३) गोपनीयता सांभाळणे
४) अशिलाबरोबर भावनिक गुंतवणूक

२४) सद्यःकालीन समाज कार्यावर प्रभाव टाकणारी विचारधारा कोणती ?
अ) बहु संस्कृतीवाद
ब) चिरंतन विकास
क) पॉलो फ्रेरे यांची लोककेंद्रित कृतीगटवादी विचारधारा
ड) मार्क्सवादी पर्यायी विकास विचारधारा

**पर्यायी उत्तरे :**
१) (अ) फक्त
२) (ब) फक्त
३) (क) व (ड) फक्त
४) (अ), (ब), (क) व (ड)

२५) रिकामी जागा योग्य पर्यायाने भरा. सुख हे आपल्या गरजपूर्तीतून किंवा ........ तून साध्य होते.
१) धनपूर्ती
२) सेवापूर्ती
३) सुविधापूर्ती
४) इच्छापूर्ती

२६) खालीलपैकी कोणते विधान व्यावसायिक समाजकार्याचे वर्णन करते ?
१) दान – धर्म करणे
२) श्रमदान/विनावेतन सेवा देणे
३) व्यक्ती, गट, समुदायाची सामाजिक व्यवहारासाठी क्षमता वाढविणे
४) शासन आणि संस्थांद्वारा अपंग, निराधार लोकांना अर्थसाहाय्य करणे.

२७) व्यक्तीला .......... सामोरे जाण्यासाठी, तिच्या समस्या सोडविण्यासाठी केलेली मदत म्हणजे व्यक्तीसहाय्य कार्य होय.
१) परिस्थितीला
२) भविष्याला
३) वास्तववादाला
४) संकटाला

२८) उद्‌बोधन भेटी, ग्रामीण शिबिर, अभ्यास सहल खालीलपैकी कशाचे घटक आहेत ?
१) सामाजिक कृती २) क्षेत्रकार्य ३) समाजकार्य संशोधन ४) समाज कल्याण प्रशासन

## (७) इतिहास

१) भारत सेवक समाजाची स्थापना नामदार गोखले यांनी कोणत्या साली केली?
१) १९१९ २) १९०५ ३) १९०६ ४) १९०४

२) भारतात अपराधीक न्यायव्यवस्थेत जनतेच्या सहभागाची कोणत्या शतकाच्या शेवटी–शेवटी सुरुवात झाली.
१) १८ व्या शतकाच्या शेवटी २) १९ व्या शतकाच्या शेवटी
३) २० व्या शतकाच्या शेवटी ४) १७ व्या शतकाच्या शेवटी

३) खालीलपैकी कोणता इंग्रज अधिकारी १८५७ च्या घटनेमध्ये सहभागी नव्हता?
१) लॉरेन्स २) कॅनिंग ३) वेलस्ली ४) हॅवलॉक

४) राजा राममोहन रॉय यांनी केलेल्या जनजागृतीमुळेच ......... यांनी १८२९ साली सतीची चाल बंद करण्यासंबंधीचा कायदा संमत केला.
१) लॉर्ड डलहौसी २) लॉर्ड रिपन ३) लॉर्ड माऊंटबॅटन ४) लॉर्ड बेंटिंक

५) खालीलपैकी कोणास 'भारतीय कामगार चळवळी'चे जनक म्हणतात?
१) ना. म. जोशी २) श्रीपाद डांगे ३) भाऊ फाटक ४) नारायण लोखंडे

६) कामगारांची दयनीय परिस्थिती सुधारावी व त्यांना कायद्याचे संरक्षण मिळावे याकरिता सर्वप्रथम कोणी प्रयत्न केला?
१) नारायण मेघाजी लोखंडे २) सोराबजी शापूरजी बंगाली
३) रसिकलाल घोष ४) फामजी मानेकजी

७) रामकृष्ण मिशनची स्थापना खालीलपैकी कोणी केली?
१) द्वारकानाथ टागोर २) देवेंद्रनाथ टागोर ३) केशबचंद्र सेन ४) स्वामी विवेकानंद

८) कोल्हापूर संस्थानामध्ये स्त्रियांच्या पुनर्विवाह नोंदणी संबंधीचा कायदा १९१७ साली कोणी केला ?
१) महाराजा सयाजीराव गायकवाड २) छत्रपती शाहू महाराज
३) महर्षी धोंडो केशव कर्वे ४) असा कायदा झालाच नव्हता

९) ''गुलामाला गुलामगिरीची जाणीव करून दिल्याशिवाय तो पेटून उठणार नाही'' असे कोणी सांगितले ?
१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर २) क्रांतिसिंह कॉ. नाना पाटील
३) साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे ४) महात्मा ज्योतिराव फुले

१०) श्री शंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक मित्र समाज व सोमवंशीय मित्र हे वृत्तपत्र कोणी सुरू केले?
अ) शिवराम जानबा कांबळे ब) गोपाळबुवा वलंगकर क) किसन फागू बनसोडे ड) गणेश आकाजी गवई
**पर्यायी उत्तरे :**
१) अ) फक्त २) अ) आणि ब) ३) ब) आणि ड) ४) ड) फक्त

११) जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| अ) भारत सेवक समाज | I) स्वामी विवेकानंद |
| ब) सेवा सदन | II) गोपाळकृष्ण गोखले |
| क) रामकृष्ण मिशन | III) डॉ. ॲनी बेझंट |
| ड) महिलांचा अखिल भारतीय संघ | IV) रमाबाई रानडे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| १) | (I) | (II) | (III) | (IV) |
| २) | (II | (IV) | (I) | (III) |
| ३) | (IV) | (III) | (II) | (I) |
| ४) | (III) | (I) | (IV) | (II) |

१२) संत साहित्याची सामाजिक आणि राष्ट्रीय कामगिरी आपल्या ग्रंथांमधून मांडणारे थोर पुरोगामी विचारवंत म्हणजे .................. हे होत.
१) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी २) गं. बा. सरदार ३) ना. ग. गोरे ४) भाई माधवराव बागल

१३) महात्मा गांधीनी वैयक्तिक सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही म्हणून खालीलपैकी कोणाची निवड केली ?
१) काका कालेलकर २) कर्मवीर आणे ३) गोपाळकृष्ण गोखले ४) विनोबा भावे

१४) तात्या टोपे यांना फाशी देण्यात आलेले ठिकाण कोणते?
१) काल्पी २) शिप्री ३) झांसी ४) ग्वाल्हेर

१५) ब्रिटिशांच्या पाश्चात्त्य शिक्षण प्रसारामुळे सर्व प्रथम .............. प्रांतांमध्ये समाज सुधारणेची चळवळ सुरू झाली.
१) मद्रास २) मुंबई ३) बंगाल ४) केरळ

१६) जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| अ) सतनामी चळवळ | I) केरळ |
| ब) नाडर चळवळ | II) मध्यप्रदेश |
| क) इझावास चळवळ | III) पंजाब |
| ड) आदिधर्म चळवळ | III) तामिळनाडू |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| १) | (II) | (IV) | (I) | (III) |
| २) | (I) | (II) | (III) | (IV) |
| ३) | (I) | (III) | (II) | (IV) |
| ४) | (IV) | (III) | (II) | (I) |

१७) समाज परिवर्तनाच्या आधुनिक पाश्चात्त्य विचारधारा खालीलपैकी कशावर आधारित नाहीत ?

१) तर्कवाद (बुद्धिप्रामाण्यवाद) २) उदारमतवाद
३) उपयुक्ततावादी ४) भक्ती आणि सूफी गूढवाद

१८) सन १८५७ चा उठाव उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर झाला. तसा मुंबई किंवा मध्य प्रांत वऱ्हाडात का झाला नाही?

अ) दुसऱ्या बाजीरावाच्या मनमानी कारभारामुळे अनेक जण दुखावले होते.
ब) स्वराज्याविषयी जनतेत आत्मीयता राहिली नव्हती.
क) परत पेशव्यांचे राज्य येईल ही भिती होती.
ड) उठावात एकसूत्रीपणा नव्हता.

**पर्यायी उत्तरे :**

१) अ) फक्त २) अ), ब) आणि क) ३) अ) आणि ड) ४) अ), ब), क) आणि ड)

१९) ब्रिटिश इंडिया कंपनीला महाराष्ट्रात रस्ते बांधण्याची आवश्यकता वाटली, कारण :

अ) महाराष्ट्रातील जमिनीचा सर्व्हे करणे, मोजणी करणे आणि महसूल व्यवस्थेत सुधारणा करून कंपनीचे उत्पन्न वाढविणे.
ब) महाराष्ट्रात पिकणारा कापूस व साखर अंतर्गत भागातून निर्यातीसाठी समुद्र किनाऱ्यावर आणण्याची कंपनीला गरज
क) दुष्काळग्रस्त भागाला लवकर धान्यपुरवठा करणे.
ड) जनतेच्या सोयीसाठी रस्ते बांधणी करणे.

**पर्यायी उत्तरे :**

१) (अ),(ब) आणि (क) २) (अ) आणि (ब) फक्त ३) (ब) फक्त ४) (ड) फक्त

२०) खालील कोणती विधाने बरोबर आहेत.

अ) 'स्त्री पुरुष तुलना' हा ग्रंथ लिहिणाऱ्या ताराबाई शिंदे सत्यशोधक समाजाच्या खंद्या कार्यकर्त्या होत्या.
ब) महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी १८९३ साली विधवांसाठी महिलाश्रम सुरू केला.
क) गोपाळ गणेश आगरकर यांच्या बंडखोर विचारामुळे धर्ममार्तंडांनी त्यांच्या जीवंतपणीच प्रेतयात्रा काढली.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ) बरोबर २) फक्त (अ) आणि (ब) बरोबर
३) फक्त (क) बरोबर ४) (अ), (ब), (क) सर्व बरोबर

२१) वि. रा. शिंदे यांनी मुंबईला डिप्रेसड् क्लासेस मिशन सोसायटीमार्फत .................... शिक्षणाची सोय केली.

१) स्त्रियांच्या २) मुलांच्या ३) दलितांच्या ४) हिंदूंच्या

२२) देशाच्या स्वातंत्र्यासाठी फासावर गेलेल्या शहीद भगतसिंहानी कोणत्या संघटनेत राहून सामाजिक व स्वातंत्र्याच्या चळवळीत भागीदारी केली ?

१) भारतीय क्रांती सेना २) नौजवान क्रांतिकारक संघटना
३) हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिक असोसिएशन (एच.एस.आर.ए.) ४) भारत नौजवान संघटन

२३) संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी दरम्यान झालेल्या कोणत्या अहवालाचा संयुक्त महाराष्ट्रवादी नेत्यांनी निषेध केला?

१) अकोला करार २) दार आयोग ३) जे. व्ही. पी. समिती ४) नागपूर करार

२४) बाळासाहेब ठाकरे यांनी १९६० मध्ये मराठीतील पहिले व्यंगचित्र साप्ताहिक सुरू केले त्यास 'मार्मिक' हे नाव खालीलपैकी कोणी सुचविले?
१) आर. के. लक्ष्मण  २) आचार्य अत्रे  ३) प्रमोद नवलकर  ४) प्रबोधनकार ठाकरे

## (८) भूगोल, लोकसमुदाय व पर्यावरण

१) जगातील प्रौढ व्यक्तींमध्ये निरक्षरतेचे प्रमाण किती आहे?
१) ७%  २) १७%  ३) २७%  ४) ३७%

२) जगात सर्वांत जास्त कोळशाचे साठे खालीलपैकी कोणत्या देशात आहेत ?
१) भारत  २) पोलंड  ३) फ्रान्स  ४) अमेरिकी संयुक्त संस्थाने

३) नागरी लोकसंख्येच्या प्रमाणाच्या बाबतीत भारतातील प्रमुख राज्यामध्ये महाराष्ट्राचा ................ क्रमांक लागतो
१) पहिला  २) दुसरा  ३) तिसरा  ४) पाचवा

४) भारतात २००१ साली झालेल्या जनगणनेनुसार सर्वांत जास्त व सर्वांत कमी लोकसंख्या असणारे राज्य व केंद्रशासित प्रदेश म्हणजे –
१) मध्यप्रदेश (सर्वांत जास्त), लक्षद्वीप (सर्वांत कमी)  २) उत्तर प्रदेश (सर्वांत जास्त), अंदमान (सर्वांत कमी)
३) बिहार (सर्वांत जास्त), गोवा (सर्वांत कमी)  ४) उत्तर प्रदेश (सर्वांत जास्त), लक्षद्वीप (सर्वांत कमी)

५) भारतात केरळ हे राज्य साक्षरतेमध्ये पहिला क्रमांक असणारे राज्य आहे. त्याखालोखाल दुसऱ्या क्रमांकाचे राज्य म्हणजे–
१) गोवा  २) मिझोराम  ३) लक्षद्वीप  ४) बिहार

६) भारताची आर्थिक राजधानी कोणती ?
१) दिल्ली  २) चेन्नई  ३) मुंबई  ४) हैद्राबाद

७) भारतात अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची सर्वांत जास्त टक्केवारी कोणत्या राज्यात आहे ?
१) उत्तर प्रदेश  २) बिहार  ३) महाराष्ट्र  ४) पंजाब

८) सातारा जिल्ह्यातून चिपळूणला जाण्यासाठी ...................... घाट उतरावा लागतो ?
१) अंबा  २) कुंभार्ली  ३) फोंडा  ४) थळ

९) खालील पर्यायातील ............ ही नदी पूर्ववाहिनी नदी नाही.
१) महानदी  २) कावेरी  ३) कृष्णा  ४) साबरमती

१०) पुढीलपैकी कोणता घटक ही भारताची ओळख नाही ?
१) मोर  २) कमळ  ३) आंबा  ४) हरीण

११) तापमान सर्वसामान्यपणे विषुववृत्तीय प्रदेशापेक्षा ध्रुवीय प्रदेशात कमी असते याचे भौगोलिक कारण .........

अ) वाऱ्याची गती ध्रुवीय प्रदेशात जास्त असते.

ब) थंड हवेमुळे भूपृष्ठाचे तापमान एकदम कमी होते.

क) ध्रुवीय प्रदेशात उष्णतेचे उत्सर्जन खूप जास्त असते.

ड) ध्रुवीय प्रदेशात सूर्याची किरणे तिरकस पडतात.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (ब) २) फक्त (ड) ३) (अ) आणि (ब) ४)(क) आणि (ड)

१२) खालीलपैकी कोणते विधान बिनचूक आहे ?

अ) १६° चे उत्तर अक्षवृत्त आंध्र प्रदेशातून जात आहे.

ब) २०° चे उत्तर अक्षवृत्त मध्य प्रदेशातून जात आहे.

क) २४° चे उत्तर अक्षवृत्त उत्तर प्रदेशातून जात आहे.

ड) २८° चे उत्तर अक्षवृत्त हिमाचल प्रदेशातून जात आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ) २) (अ) आणि (ब) ३) (क) आणि (ड) ४) फक्त (ड)

१३) भारतीय बेटे देशाला महत्त्वाची आहेत याचे प्रमुख कारण ......

अ) येथे मोठ्या प्रमाणावर मासेमारी चालते.

ब) बेटे पर्यटकांची आकर्षण स्थळे आहेत.

क) बेटांचा उपयोग नाविक दलास होतो.

ड) बेटे भारताच्या सागरी सीमा व संरक्षणाच्या दृष्टीने उपयोगी पडतात.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त ड) २) फक्त ब) ३) अ) आणि ब) ४) ब) आणि क)

१४) पूर्व किनाऱ्याच्या तुलनेने पश्चिम किनाऱ्यावर चांगली बंदरे आहेत याचे सर्वात महत्त्वाचे व प्रमुख कारण......

अ) पश्चिम किनाऱ्यावर अधिक चांगला व्यापार चालतो.

ब) पश्चिम किनाऱ्यावरून जगातील सर्व देश सागरी मार्गाने जोडलेले आहेत.

क) पश्चिम किनाऱ्यावर वाहतुकीच्या सर्व प्रकारच्या सुविधा आहेत.

ड) पश्चिम किनारा अधिक खोल व दंतुर आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त क) २) फक्त ड) ३) अ) आणि ब) ४) ब) आणि क)

१५) विधान पूर्ण करण्यासाठी योग्य पर्याय निवडा.

कोकणात भरपूर पाऊस पडूनही तेथे पाणीटंचाई असते कारण ...............

१) तेथील नद्यांना तीव्र उतार आहे. २) तेथील नद्यांची लांबी कमी आहे.

३) तेथील नद्यांची संख्या कमी आहे. ४) वरील सर्व कारणे योग्य आहेत.

१६) खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे?

अ) नर्मदा व तापी नदीच्या दरम्यान सातपुडा पर्वत आहे.

ब) नर्मदा व तापी नदीच्या दरम्यान अजिंठा डोंगर रांगा आहेत.

क) गोदावरी व भीमा नदीच्या दरम्यान सातमाळा डोंगर रांगा आहेत.

ड) गोदावरी व भीमा नदीच्या दरम्यान शंभू महादेव डोंगररांगा आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ) २) फक्त क) ३) ब) आणि क) ४) क) आणि ड)

१७) महाराष्ट्रातील मागील ५० वर्षांचा कालावधी लक्षात घेता असे आढळते की प्रत्येक दशकात भुईमूग या पिकाचे उत्पादन घटलेले आहे. त्यासाठी खालीलपैकी सर्वात प्रमुख कारण कोणते?

१) प्रत्येक दशकात जमिनीची सुपीकता कमी झाली आहे.

२) प्रत्येक दशकात महाराष्ट्रातील पर्जन्यमान अतिशय अपुरे आहे.

३) प्रत्येक दशकात लागवडीचे क्षेत्र घटत गेलेले आहे.

४) प्रत्येक दशकात उच्च प्रतीच्या बियाणांची कमतरता आहे.

१८) खालीलपैकी कोणते विधान बिनचूक आहे?

अ) महाराष्ट्रात औष्णिक वीज उत्पादन जास्त होते.

ब) महाराष्ट्रात नैसर्गिक वायूपासून सर्वाधिक विजेचे उत्पादन होते.

क) महाराष्ट्रात पाण्याद्वारे विजेचे उत्पादन जास्त होते.

ड) महाराष्ट्रात अक्षय ऊर्जा निर्मितीचे प्रमाण जास्त आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ) २) फक्त क) ३) अ) आणि ब) ४) क) आणि ड)

१९) खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

अ) महाराष्ट्रात घरगुती विजेचा वापर सर्वाधिक आहे.

ब) महाराष्ट्रात औद्योगिक क्षेत्रात विजेचा वापर सर्वाधिक आहे.

क) महाराष्ट्रात कृषी क्षेत्रात विजेचा वापर सर्वाधिक आहे.

ड) महाराष्ट्रात वाणिज्य क्षेत्रात विजेचा वापर सर्वाधिक आहे.

१) फक्त (अ) २) फक्त (ब) ३) (अ) आणि (ब) ४) (क) आणि (ड)

२०) खालीलपैकी कोणते विधान मुंबई शहरासाठी लागू पडत नाही?

१) भारताची आर्थिक राजधानी

२) भारतातील सर्वात मोठे औद्योगिक केंद्र

३) सात बेटांचे शहर

४) महाराष्ट्रातील सर्वात जास्त लोकसंख्येचा जिल्हा

२१) भारतात लोकसंख्येचा विस्फोट होण्यास कोणते/कोणती कारणे आहेत ?

अ) नैसर्गिक आपत्तीवर नियंत्रण

ब) जन्म दरात वाढ तर मृत्यू दरात घट

क) अल्प वयात विवाह करण्याची प्रथा

ड) धार्मिक कारणावरून कुटुंब नियोजनास विरोध

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ)

२) फक्त (ब)

३) फक्त (ब), (क)

४) वरील सर्व (अ), (ब), (क), (ड)

२२) खालील विधानांवरून योग्य पर्याय निवडा :

अ) महाराष्ट्रातील स्त्री–पुरुष प्रमाण (लिंगगुणोत्तर) हे सन २००१–२०११ या काळात ९२२ वरून ९२५ पर्यंत वाढले.

ब) सन २०११ नुसार, महाराष्ट्राचे लिंगगुणोत्तर हे देशाच्या लिंगगुणोत्तरापेक्षा १५ (पंधराने) ने कमी आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) केवळ (अ) सत्य आहे
२) केवळ (ब) सत्य आहे.
३) दोन्ही विधाने असत्य आहेत.
४) दोन्ही विधाने सत्य आहेत.

२३) 'जागतिक तापमानवाढ' ही संकल्पना सर्वप्रथम जनमानसात कोणी रुजवली ?

१) वॅलेस ब्रोकर
२) डॉ. राजेंद्र पचौरी
३) पॉल क्रुगमन
४) विल्यम गॉउड

२४) उचित पर्याय निवडा.

पर्यावरणाचा तोल बिघडण्याचे कारण म्हणजे ......

१) विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संपदेचा केला जाणारा अनिर्बंध वापर.
२) प्रगत राष्ट्रांकडून केला जाणारा विकसनशील देशांच्या साधनसंपत्तीचा गैरवापर.
३) काही देशांच्या लोक संख्यावाढीमुळे त्यांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर पडणारा गैरवाजवी ताण.
४) वरील सर्व

२५) जागतिक स्तरावरून अक्षय–विकासाचा आग्रह धरण्याचे कारण ......

१) यातून पर्यावरणाचा वाजवी उपयोग करून घेतानाच त्याचे योग्यप्रकारे संवर्धन होईल हे पाहिले जाते.
२) यात क्षयी नैसर्गिक साधन–संपत्ती वापरली जाणार नाही हे पाहिले जाते.
३) यात क्षयी नैसर्गिक साधनसंपत्तीला पर्याय शोधण्यावरच भर दिला जातो.
४) वरील सर्व

२६) महाराष्ट्रातील गावे पर्यावरण पूरक आणि नियोजनबद्धरीत्या विकसित व्हावीत यासाठी ऑक्टोबर २०१० पासून शासनाने कोणती योजना सुरू केली आहे ?

१) हरीत ग्राम योजना
२) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता योजना
३) निर्मल ग्राम योजना
४) पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना

२७) जमिनीची धूप म्हणजे ..........

अ) जमिनीचे निकृष्टीकरण
ब) जमिनीचा कस कमी होणे
क) जमिनीची उत्पादकता घटणे
ड) वारा व पाण्यामुळे जमिनीचा थर वाहून जाणे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (ब)
२) फक्त (अ)
३) फक्त (ड)
४) (अ),(ब) आणि (क)

२८) खालीलपैकी कोणत्या गोष्टीमुळे जमिनीचे निरुपयोगी क्षेत्र वाढले आहे.

१) सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे
२) अमर्याद जंगल तोडीमुळे
३) मातीची धूप झाल्याने व भूमिपातामुळे
४) सागराचे पाणी शेती योग्य जमिनीत घुसल्यामुळे

# (९) राज्यव्यवस्था, शासन, राजनीती व स्थानिक प्रशासन

१) महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्था केव्हापासून अमलात आली ?
१) १ मे १९६० २) २६ नोव्हेंबर १९४९ ३) १ मे १९६२ ४) १ मे १९५२

२) महाराष्ट्रातील शिवसेनेची स्थापना ...... साली करण्यात आली.
१) १८८५ २) १९४७ ३) १९६६ ४) १९८५

३) महाराष्ट्र शासनाने 'ग्राम न्यायालय कायदा – २००८' हा कधी लागू केला ?
१) ३ ऑक्टोबर, २००८ २) २ ऑक्टोबर २००९ ३) १ मे, २००८ ४) ३ मे, २००९

४) २०व्या कायदा आयोगाचा कालावधी काय होता?
१) १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१५ २) १ जून २०१२ ते ३१ मे २०१५
३) १ सप्टेंबर २०१२ ते ३१ ऑगस्ट २०१५ ४) १ जानेवारी २०१३ ते ३१ डिसेंबर २०१५

५) दरवर्षी महाराष्ट्र राज्यशासन कोणत्या दिवशी राज्यातील तंटामुक्त गावांची यादी जाहीर करते ?
१) १५ ऑगस्ट २) १ ऑगस्ट ३) २६ जानेवारी ४) २ ऑक्टोबर

६) महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० मधील कोणत्या भागात जमीन सुधार आकार याविषयीची तरतूद आहे?
१) विभाग २ २) विभाग ४ ३) विभाग ५ ४) विभाग ७

७) किमान किती लोकसंख्या असलेल्या शहरासाठी महानगरपालिका स्थापन करता येते ?
१) दोन लाख २) चार लाख ३) सहा लाख ४) तीन लाख

८) केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या सदस्याचा कार्यकाळ किती वर्षांचा असतो ?
१) ५ २) ६ ३) ३ ४) ७

९) भारतीय राज्यघटनेमध्ये सद्य:स्थितीत किती परिशिष्टे आहेत.
१) ०८ २) १० ३) १२ ४) १४

१०) भारतीय राज्यघटनेचा अनुच्छेद क्रमांक ........ हा समान किंवा सन्मानपूर्वक व्यवहार या संबंधीचे स्पष्टीकरण देतो.
१) १६ २) १५ ३) १७ ४) १८

११) भारतीय राज्यघटनेच्या ...... व्या कलमात दुरुस्ती करून ''शिक्षणाचा हक्क'' हा मूलभूत हक्क म्हणून समाविष्ट करण्यात आलेला आहे.
१) १५ २) १६ ३) २१ ४) २४

१२) भारतीय राज्यघटनेतील कोणत्या कलमामध्ये देशातील स्त्री–पुरुषांना समान कामासाठी समान वेतन देण्याच्या मार्गदर्शक तत्त्वाची तरतूद आहे ?

१) कलम ३८ २) कलम ३९ ३) कलम ४० ४) कलम ४१

१३) भारतीय राज्यघटनेचा कोणता अनुच्छेद शासनास सर्व भारतीय नागरिकांना मोफत व समान न्याय देण्याचे निर्देश देतो ?

१) ३८ अ २) ३९ अ ३) १७ ४) १८

१४) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश वयाची ...... वर्षे पूर्ण झाल्यावर निवृत्त होतात.

२) ६५ २) ६० ३) ५८ ४) ६२

१५) खालीलपैकी ............. या घटनादुरुस्तीचे एक ठळक वैशिष्ट्ये म्हणजे महापौर व नगराध्यक्षांचे पद आळीपाळीने महिलांसाठी राखून ठेवण्यात आले.

१) ४३ व ४५ २) ७३ व ७४ ३) २७ व ३३ ४) १५ व २७

१६) भारतीय राज्यघटनेत केंद्र सूचीमध्ये किती विषय समाविष्ट आहेत?

१) ७७ २) ४७ ३) ९७ ४) ६७

१७) भारतीय राज्यघटनेच्या खालीलपैकी कोणत्या कलमामध्ये जम्मू–काश्मीर या राज्याला देशातील अन्य राज्यांपेक्षा विशिष्ट दर्जा दिल्याचे नमूद केले आहे?

१) ३६० २) ३७० ३) ३८० ४) ३९०

१८) भारतीय राज्यघटना निर्मितीसाठी तयार केलेल्या विविध समित्यांपैकी मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून कोणी पाहिले ?

१) डॉ. राजेंद्र प्रसाद २) डॉ. के. एम.. मुन्शी ३) डॉ. बी. आर. आंबेडकर ४) बी. पट्टाभी सितारामय्या

१९) १९५३ साली नेमण्यात आलेल्या राज्य पुनर्रचना आयोगाचे अध्यक्ष कोण होते ?

१) पं. जवाहरलाल नेहरू २) न्या. एस. के. दार ३) न्या. फाजल अली ४) सरदार के. एम. पण्णिकर

२०) भारतातील पंचायतीराजची सुरुवात कोणत्या समितीच्या शिफारशीनुसार झाली?

१) पी. बी. पाटील समिती २) मुदलियार समिती

३) बलवंतराय मेहता समिती ४) वरीलपैकी कोणत्याही नाही

२१) 'पुढच्या दोन वर्षांत महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही तर मला फाशी द्या' असे जाहीररीत्या कोणी सांगितले होते?

१) यशवंतराव चव्हाण २) सुधाकरराव नाईक ३) वसंतराव नाईक ४) शंकरराव चव्हाण

२२) योग्य जोड्या लावा :

| I गट | II गट |
|---|---|
| अ) वसंतराव नाईक | I) जायकवाडी प्रकल्प |
| ब) शंकरराव चव्हाण | II) विनाअनुदानित शाळा/महाविद्यालये |
| क) वसंतदादा पाटील | III) कृषी संशोधनास प्रोत्साहन |
| ड) शरद पवार | IV) ग्रामीण रोजगार हमी योजना |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| १) | (IV) | (I) | (II) | (III) |
| २) | (I) | (IV) | (III) | (II) |
| ३) | (IV) | (II) | (I) | (III) |
| ४) | (IV) | (III) | (II) | (I) |

२३) न्यायालयीन पुनर्विलोकनाचे तत्त्व भारतीय राज्यघटनेत कोणत्या देशापासून स्वीकारण्यात आले?
१) चीन २) इंग्लंड ३) फ्रान्स ४) अमेरिका

२४) भारताच्या राष्ट्रपतींना आणीबाणी जाहीर करण्याचा अधिकार देणारी तरतूद करताना कोणत्या देशाच्या राज्यघटनेकडून प्रेरणा घेतली गेली ?
१) जर्मनीची वाईमर प्रजासत्ताक राज्यघटना २) सोव्हिएट रशियाची राज्यघटना
३) अमेरिकेची राज्यघटना ४) जपानची राज्यघटना

२५) पुढीलपैकी कोणते प्रदेश 'राज्य' या दर्जाचे नाहीत ?
१) मिझोराम २) पुडुचेरी (पाँडिचेरी) ३) त्रिपुरा ४) झारखंड

२६) जिल्हा न्यायाधीशांची नेमणूक राज्यपाल ...... च्या सल्ल्याने करतात.
१) महाअधिवक्ता २) मुख्यमंत्री ३) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश ४) कायदेमंत्री

२७) भारताच्या वार्षिक अंदाजपत्रकातील सार्वजनिक महामंडळांचे हिशोब तपासण्याचे काम संसदेची कोणती समिती करते?
१) अंदाज समिती २) लोकलेखा समिती ३) प्रवर समिती ४) यापैकी नाही

२८) शिक्षणमंत्री व शिक्षण संचालक यांच्यातील दुवा ......
१) अध्यक्ष २) सचिव ३) शिक्षणाधिकारी ४) मुख्य कार्यकारी अधिकारी

२९) पुढील विधाने वाचून गाळलेल्या जागेसाठी योग्य पर्याय निवडा.
''जो जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने, आपल्या अपत्यास अथवा पाल्यास त्याच्या, वयाच्या सहाव्या वर्षापासून तो चौदाव्या वर्षापर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी.''
हे विधान भारतीय संविधानानुसार .................... आहे.
१) कायदा २) मूलभूत कर्तव्य ३) मूलभूत हक्क ४) मूलभूत गरजा

Study CIRCLE

३०) 'आधार' योजनेविषयीचे कोणते विधान सत्य आहे?
१) ती केवळ भारतीय नागरिकांसाठी आहे. २) भारतातील सर्व रहिवासी त्यासाठी सशर्त पात्र आहेत.
३) ती केवळ प्रौढ व्यक्तींसाठी आहे. ४) ती शासनमान्य संस्थांना मिळू शकेल.

३१) भारताचे संविधान कोणत्या विचारधारेचा पुरस्कार करते?
१) धर्मनिरपेक्षता २) निदेशक तत्त्वांच्या संबंधात मूलभूत हक्कांची सर्वोच्चता
३) मूलभूत कर्तव्ये ४) वरील सर्व

३२) रिकामी जागा सुयोग्य शब्दाने भरा. राष्ट्राचा कारभार ......... तसेच भ्रष्टाचारविरहित चालवायचा असल्यानेच संसदेने जनतेसाठी 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५' हा कायदा संमत केला आहे.
१) चांगला २) पारदर्शकपणे ३) प्रगतिशील ४) विकासाभिमुख

## (१०) अर्थव्यवस्था

१) भारतातील व्यापारी बँकांच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान/विधाने खरे/खरी ठरते/ठरतात?
अ) मार्च १९५० अखेर व्यापारी बँकांची संख्या ५४५ व त्यांच्या शाखांची संख्या ४,०५५ होती.
ब) जून १९६९ मध्ये व्यापारी बँकांची संख्या १५६ व त्यांच्या शाखांची संख्या ८,२२६ होती.
क) मार्च २०१० अखेर व्यापारी बँकांची संख्या १६९ व त्यांच्या शाखांची संख्या ८५,३९३ होती.
ड) मार्च २०११ अखेर व्यापारी बँकांची संख्या ११० व त्यांच्या शाखांची संख्या ३२,६२४ होती.
**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त ड) २) अ), ब), क) ३) वरील सर्व ४) वरीलपैकी कोणतेही नाही

२) खालील तक्त्यात वर्ष व भारताच्या निर्यातीचे प्रमाण दाखविले आहे. त्यावरून योग्य जोडी जुळवा.

| **वर्ष** | **भारताच्या एकूण निर्यातीपैकी विशिष्ट देशातील निर्यातीचे प्रमाण** | | | |
|---|---|---|---|---|
| | | **(a)** | **(b)** | **(c)** |
| अ) १९५०–५१ | इंग्लंड | २.८ | २६.८ | ११.७ |
| ब) २०१०–११ | यू.एस.ए. | १०.० | १८.६ | १६.८ |
| | ऑस्ट्रेलिया | ०.६ | ६.६ | १.७ |
| | रशिया | ६.० | १.० | १२.५ |

**पर्यायी उत्तरे :**
१) अ) = b), ब) = a) २) अ) = a), ब) = c)
३) ब) = b), अ) = c) ४) वरील कोणताही पर्याय योग्य नाही

३) योग्य जोडी जुळवा :

| X गट (वर्ष) | Y गट (शेकडा प्रमाण) भारताच्या एकूण निर्यातीत शेती क्षेत्राचा वाटा |
|---|---|
| अ) १९६०–६१ | a) ५०% |
| ब) २००६–०७ | b) ४४.२% |
| | c) १०.३% |
| | d) ८.०% |

**पर्यायी उत्तरे :**

१) अ) : a), ब) : b)
२) अ) : b), ब) : c)
३) अ) : c), ब) : a)
४) अ) : d), ब) : b)

४) ग्रामीण भागाच्या विकासात महत्त्व पूर्ण योगदान देणाऱ्या ''पंतप्रधान ग्रामसडक योजना'' केंद्र सरकारकडून ............... % अनुदान मिळते.

१) ८०% २) १००% ३) ९०% ४) ५०%

५) प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीच्या संदर्भात (एफ.डी.आय.) संसदेमध्ये कोणत्या नियम क्रमांकानुसार चर्चा झाली?

१) २५२ २) ४७६ ३) १८४ ४) १०४

६) जगातून पिळवणुकीचा अंत होण्यासाठी उत्पादनाच्या साधनांवरील खाजगी मालकी नष्ट होणे आवश्यक असल्याचा सिद्धांत कोणी मांडला ?

१) अल्बर्ट आइनस्टाईन २) मॅक्स वेबर ३) कार्ल मार्क्स ४) गौतम बुद्ध

७) खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाची प्रक्रिया कोणत्या पंतप्रधान व अर्थमंत्र्यांच्या काळात प्रारंभ झाली ?

१) पंतप्रधान राजीव गांधी व अर्थमंत्री व्ही. पी. सिंग
२) पंतप्रधान नरसिंहराव व अर्थमंत्री मनमोहन सिंग
३) पंतप्रधान आय. के. गुजराल व अर्थमंत्री पी. चिदंबरम
४) पंतप्रधान मनमोहन सिंग व अर्थमंत्री पी. चिदंबरम

८) अकराव्या पंचवार्षिक योजनेचे उपाध्यक्ष .............. हे आहेत.

१) डॉ. मनमोहनसिंग २) मोहन धारिया ३) पी. चिदंबरम ४) माँटेकसिंग अहलुवालिया

९) ''भारताची अर्थव्यवस्था मोठी असली तरीही गेल्या २० वर्षात तिच्या झालेल्या वाढीचा फायदा भारतातील केवळ २३% लोकसंख्येलाच झाला. उर्वरित ७७% जनतेकडे या अर्थव्यवस्थेचे दुर्लक्षच झाले''असे कोणी म्हटले आहे ?

१) अमर्त्य सेन २) बेकार भत्ता दिला जातो ३) पी. चिदंबरम ४) अर्जुन सेनगुप्ता

१०) खालीलपैकी प्रत्यक्ष कर कोणता आहे ?

१) अबकारी कर २) विक्री कर ३) आयकर ४) वरीलपैकी सर्व

११) 'बँक दर' म्हणजे असा दर की ज्या दराने रिझर्व्ह बँक ..................... कर्ज देते.

१) व्यापारी बँकांना २) विदेशी बँकांना ३) केंद्र शासनाला ४) नाबार्डला

१२) नाफेड (NAFED) खालीलपैकी कशाशी संबंधित आहे ?

१) शेतीमाल विक्री २) पशुसंवर्धन ३) शेती सुधारणा ४) कुटिरोद्योगांना उत्तेजन

१३) भारत हा ................ देश आहे.

१) विकसित २) अविकसित ३) विकसनशील ४) अविकसनशील

१४) जागतिकीकरणाचा ....................... हा आत्मा आहे.

१) कुटीर उद्योग २) खाजगीकरण ३) औद्योगिकरण ४) शिक्षणाचे सार्वत्रीकरण

१५) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेनुसार कामाची मागणी करणाऱ्या व्यक्तीस १५ दिवसात काम न दिल्यास अशा व्यक्तीस–
१) १५ दिवसांचे धान्य दिले जाते
२) बेकार भत्ता दिला जातो
३) स्वयंरोजगारासाठी साहाय्य दिले जाते
४) खाजगी काम शोधून दिले जाते

१६) 'ट्रायसेम' या कल्याण कार्यक्रमाचे मराठीत पूर्ण रूप सांगा.
१) ग्रामीण युवकांसाठी प्रशिक्षण
२) ग्रामीण युवक कल्याण कार्यक्रम
३) ग्रामीण युवकांसाठी स्वयंरोजगाराबाबत प्रशिक्षण
४) ग्रामीण युवक विकास कार्यक्रम

१७) खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे .................
१) संघटित क्षेत्रातील कामगार–कर्मचाऱ्यांची संख्या वाढली आहे.
२) असंघटित क्षेत्रातील कामगार–कर्मचाऱ्यांची संख्या वाढली आहे.
३) तंत्रज्ञानामुळे जास्त लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.
४) वरीलपैकी एकही नाही.

१८) भाववाढ कमी करण्यासाठी मागणीच्या प्रमाणात पुरवठा वाढविला पाहिजे पण सद्यःस्थितीत पुरवठा वाढविण्यात कोणते अडथळे आहेत ?
अ) भारतातील मान्सूनची अनिश्चितता
ब) उत्पादनात सुधारित तंत्रज्ञानाचा वाढता वापर
क) इंधन टंचाई व वाहतूक वाढीत निर्माण होणारे अडथळे
ड) विविध उद्योगांना जाणवणारी कच्च्या मालाची टंचाई.
**पर्यायी उत्तरे :**
१) (अ),(ब),(क)   २) (क),(ब),(इ)   ३) (अ),(क),(ड)   ४) वरील सर्व

१९) शेतीच्या व्यापारीकरणामुळे महाराष्ट्रावर काय परिणाम झाले ?
अ) जुन्या धंद्याचा ऱ्हास झाला तरी शेत मालावर आधारित काही नवीन यांत्रिक धंद्याची वाढ झाली.
ब) महाराष्ट्रातील अंतर्गत व्यापार वाढला.
क) शेतातील कच्च्या मालाची निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढली.
ड) व्यापारी व सावकार यांचे महत्त्व कमी झाले.
**पर्यायी उत्तरे :**
१) (अ) फक्त   २) (क) फक्त   ३) (अ), (ब) आणि (क)   ४) (अ) आणि (ड)

२०) खालीलपैकी कोणत्या उपायामुळे भाववाढ कमी होण्याऐवजी त्यात वाढ घडून येईल?
१) चलनाचा पुरवठा कमी करणे
२) चलनाचा पुरवठा वाढविणे
३) वित्तीय तूट कमी करणे
४) वस्तू व सेवेचा पुरवठा वाढविणे

२१) कॅगच्या लेखा परीक्षणात खालीलपैकी कशाचा समावेश नसतो?
१) रेल्वे   २) संरक्षण क्षेत्र   ३) सरकारचे येणे   ४) खाजगी क्षेत्राचे लेखा परीक्षण

२२) कॅगच्या कार्यक्षमता लेखा परीक्षण संदर्भात खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?
१) सरकारी योजनेने कमीत कमी खर्चात ध्येय साध्य केले की नाही ते तपासणे
२) खर्च करण्याचा अधिकार तपासणे
३) नियम व कायद्याचे पालन झाले की नाही तपासणे
४) सक्षम अधिकाऱ्याने खर्च मान्य केले की नाही तपासणे

२३) योजना काळात भारत सरकारच्या करेत्तर महसुलाची कोणती प्रवृत्ती दिसून येते?
१) स्थिर २) घटती ३) वाढती ४) ऋणात्मक

२४) भारतातील विभागीय ग्रामीण बँकांच्या तोट्याची कारणे कोणती?
अ) असंख्य खातेदारांच्या, खाते हाताळण्याचा खर्च जास्त आहे.
ब) सवलतीच्या व्याजदरात कर्ज देण्याचे धोरण.
क) ग्रामीण भागातून जमा होणाऱ्या ठेवीचे प्रमाण कमी आहे.
ड) थकबाकीचे प्रमाण वाढत आहे.
**पर्यायी उत्तरे :**
१) अ) आणि ब) २) अ), ब), क) ३) वरील सर्व ४) वरीलपैकी कोणतेही नाही

२५) पुढील विधानाचा परिणाम काय होईल ते सांगा.
सर्वसाधारण कर आकारणीमुळे किंमत पातळीवरील परिणाम ............
अ) ज्या कर आकारणीत प्रत्यक्ष करांचे प्रमाण अधिक असते, त्या कर आकारणीमुळे किंमत पातळी स्थिर ठेवण्यास मदत होते.
ब) ज्या कर आकारणीत अप्रत्यक्ष करांचे प्रमाण अधिक असते, अशा कर आकारणीमुळे किंमत पातळी वाढत जाते.
क) कर आकारणीमुळे किंमत पातळीवर कोणताही परिणाम होत नाही.
**पर्यायी उत्तरे :**
१) अ) आणि ब) २) फक्त क) ३) वरीलपैकी सर्व ४) वरीलपैकी कोणताही नाही

२६) भारतातील आयात-निर्यात करा-संबंधी खालीलपैकी कोणते वाक्य/वाक्ये बरोबर आहे/आहेत?
१) सुमारे ९९% उत्पन्न आयातीवरील कराद्वारे मिळते.
२) निर्यातीवरील कराद्वारे सरकारला फार मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळते.
३) निर्यात कराद्वारे मिळणारे तुलनात्मक उत्पन्न हे आयातीवरील कराद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे.
४) वरीलपैकी कोणतेही नाही.

२७) राज्य सरकारची अर्थ संकल्पीय तूट खालीलपैकी कोणत्या कारणाने कमी करता येत नाही, त्यावर मर्यादा आहेत.
१) राज्य सरकारचे उत्पन्न वाढवून २) राज्य सरकारचे खर्च कमी करून
३) केंद्र सरकारकडून कर्ज घेऊन ४) परकीय कर्ज घेऊन

२८) राजकोषीय (Fiscal Police) धोरणाचा संबंध कशाशी असतो?
अ) कर आकारणी ब) सार्वजनिक कर्ज क) सार्वजनिक खर्च
ड) सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन इ) पत नियंत्रण

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त ब) आणि क) २) अ), ब), क), ड) ३) फक्त ड) आणि इ) ४) इ), ड), क), अ)

२९) ग्रामीण कर्ज पुरवठ्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कोणत्या दोन घटकामधील दुवा आहेत?

१) शेतकरी व सरकार
२) व्यापारी व दलाल
३) प्राथमिक सहकारी संस्था व राज्य सहकारी बँका
४) व्यापारी बँका व भारतीय रिझर्व्ह बँक

३०) पुढील **'अ'** गट व **'ब'** गट यातील विधानांची योग्य जोडी जुळवा.

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| A) मध्यवर्ती बँक | c) बँक नियंत्रण व विकासात्मक कार्य करणे |
| B) व्यापारी बँक | d) खातेदारांच्या ठेवी घेणे व त्यांना कर्ज देणे |
| | e) शेवटचा आश्रयदाता म्हणून कार्य करणे |
| | f) अग्रणी बँक योजना राबविणे |
| | g) सरकारची बँक म्हणून कार्य करणे |
| | h) पत निर्मिती करणे. |

**पर्यायी उत्तरे :**

१) A) : c), d), e) B) : f), g), h)
२) A) : f), g), h) B) : c), d), e)
३) A) : d), f), h) B) : c), e), g)
४) A) : c), e), g) B) : d), f), h)

३१) दारिद्र्य निर्मूलनाच्या कोणत्या योजनेनुसार भारतात गरीब लोकांना २ रु. प्रति किलो गहू व ३ रु. प्रति किलो उपलब्ध करून दिला जातो?

१) अन्नपूर्ण योजना
२) अंत्योदय योजना
३) मध्यान्ह भोजन योजना
४) जवाहर रोजगार योजना

३२) मागील पाच वर्षाच्या काळात, भारतातील भाववाढीच्या संदर्भात कोणते/कोणती विधान/विधाने खरे/खरी ठरते/ठरतात?

अ) पूर्वीपेक्षा घाऊक किंमत निर्देशांकाचा पाया विस्तृत करण्यात आला आहे.
ब) औद्योगिक कामगारांचा उपभोग किंमत निर्देशांक तुलनात्मकदृष्ट्या कमी वाढ दर्शवितो.
क) कृषी कामगारांचा उपभोग किंमत निर्देशांक तुलनात्मकदृष्ट्या जास्त वाढ दर्शवितो.
ड) औद्योगिक कामगारापेक्षा कृषी कामगारावर भाववाढीचा जास्त प्रतिकूल परिणाम झाला आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त ड) २) अ), ब), क) ३) ब), क), ड) ४) वरील सर्व

३३) भारताच्या विदेशी व्यापाराशी निगडीत खालील विधाने विचारात घ्या.

अ) नियोजन काळामध्ये भारताच्या निर्यात मूल्यामध्ये व आयात मूल्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली.
ब) नियोजन काळामध्ये व्यापारातील तुटीमध्ये वाढ झाली आहे.
क) नियोजन काळामध्ये विदेशी व्यापाराची दिशा संकुचित झाली आहे.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने सत्य आहे/आहेत?

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ) २) फक्त अ) आणि ब) ३) वरील सर्व ४) वरीलपैकी कोणतेही नाही

३४) सन २००९-१० च्या आर्थिक वर्षासंदर्भात पुढील विधाने विचारात घ्या.
अ) केंद्र सरकारची महसुली तूट GDP च्या ५% होती.
ब) अन्न, खते व निर्यात अनुदाने यासाठी अनुदानासाठी केंद्र सरकारने GDP च्या १.९% खर्च केला.
क) सदर वर्षी सार्वजनिक खर्चाचे प्रमाण GDP च्या २९% होते.
ड) केंद्र सरकारच्या एकूण महसुली उत्पन्नापैकी कर उत्पन्न ७०% होते.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?
१) अ), ब), क) २) ब), क), ड) ३) अ), क), ड) ४) वरील सर्व

३५) गेल्या १० वर्षाच्या काळातील भारताच्या विदेशी व्यापाराच्या संदर्भात पुढील विधाने विचारात घ्या.
अ) भारताचे आयातमूल्य हे निर्यात मूल्यापेक्षा सतत जास्त राहिले आहे.
ब) आयात मूल्यामध्ये अन्नधान्याच्या आयातीवर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो.
क) भारताच्या आयात व निर्यातीच्या मूल्यात सतत घट होत आहे.
ड) शेती आधारित वस्तू व शेतीजन्य औद्योगिक कच्चा माल यांची निर्यात घट आहे.
वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने खरी ठरतात?
१) अ) आणि ड) २) ब) आणि क) ३) अ), ब), क) ४) वरील सर्व विधाने

## (११) विज्ञान

१) एखाद्या पदार्थांचे तापमान १००° C आहे, तर त्या पदार्थांचे केलव्हिन मापनश्रेणीमध्ये तापमान ............ असते.
१) १७३ K २) १०० K ३) ३७३ K ४) २७३ K

२) भूस्थिर कक्षेत फिरणाऱ्या उपग्रहाला पृथ्वीभोवती एक फेरी पूर्ण करण्यासाठी किती कालावधी लागतो?
१) २४ तास २) ७ दिवस ३) एक महिना ४) एक वर्ष

३) मानवी रक्त गटाचा शोध कोणी लावला?
१) मेकेंझी २) थॉमस हंट मार्गन ३) अलेक्झांडर फ्लेमींग ४) कार्ल लॉडस्टायनर

४) भाभा अणुऊर्जा केंद्राने कोणत्या ठिकाणी कृषी उत्पादन संरक्षण केंद्राची स्थापना केली आहे ?
१) माणगाव २) लासलगाव ३) कुळगाव ४) नांदगाव

५) महाराष्ट्रातील आरोग्य विज्ञान विद्यापीठ .................... येथे आहे.
१) नागपूर २) लोणेरे ३) अमरावती ४) नाशिक

६) महाराष्ट्राच्या कोणत्या शहरात उपग्रह दूरनियंत्रण केंद्र नियोजित आहे?
१) नागपूर २) पुणे ३) शेगाव ४) मुंबई

७) ध्वनीचे मापन ...... मध्ये करतात.
१) नॅनोमीटर २) सेंटिमीटर ३) डेसिबल ४) डेसीमीटर

८) खालीलपैकी कोणत्या बाबी केंद्रकीय संम्मीलनावर आधारित आहेत?
अ) सूर्यप्रकाशाची निर्मिती ब) अणुबॉम्ब क) हायड्रोजन बॉम्ब ड) विद्युत निर्मिती
**पर्यायी उत्तरे :**
१) अ) आणि ब) २) अ) आणि क) ३) ब), क) आणि ड) ४) अ, क) आणि ड)

९) भारतीय राष्ट्रीय उपग्रह प्रणाली (इन्सॅट मालिका) ही बहुउद्देशीय उपग्रह प्रणाली असून तिचा उपयोग कशाकरिता केला जातो?
अ) दूरसंचार ब) हवामान अंदाज
क) आकाशवाणी–दूरदर्शनचे राष्ट्रवादी प्रसारण ड) नैसर्गिक आपत्तींची पूर्वसूचना
**पर्यायी उत्तरे :**
१) अ) आणि ब) २) ब) आणि क) ३) क) आणि ड) ४) वरील सर्व

१०) कोणत्या ग्रहावर बर्फाचे साठे असल्याचा निश्चित पुरावा गत वर्षी उपलब्ध झाला आहे?
१) बुध २) गुरू ३) मंगळ ४) शुक्र

११) सुदूर संवेदन उपग्रह कोणत्या कक्षेत भ्रमण करतात?
१) वर्तुळाकार व ध्रुवीय २) अंडाकृती व विषुववृत्तीय
३) वर्तुळाकार व विषुववृत्तीय ४) अंडाकृती व ध्रुवीय

१२) ओझोन वायूचे मोजमाप ...... या एककात केले जाते.
१) डॉबसन २) सॉबसन ३) ओझोनमीटर ४) ओझोन इंटेन्सिफार

१३) एल. पी. जी. मध्ये ...................... हे घटक असतात.
१) ब्युटेन आणि आयसोब्युटेन २) मिथेन आणि ब्युटेन ३) मिथेन आणि इथेन ४) इथेन आणि ब्युटेन

१४) इंधनाचा पर्यायी स्रोत म्हणून कोणत्या वनस्पतीची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात येत आहे?
१) जट्रोपा (Jatropa) २) स्ट्रॉबेरी ३) लिची ४) पेअर

१५) कोणत्या कंपनीच्या भागीदारास बीटी कापूस बियाणे विकण्यास सरकारने प्रतिबंध केला आहे?
१) ड्यूपाँट २) मोन्सान्टो ३) सिंजेंटा ४) बेयर

१६) DNA चा रेणू हा पुढीलपैकी कोणत्या रसायनांच्या संचाच्या लांबलचक शृंखलांनी बनलेला असतो ?
१) नत्रयुक्त आम्लारी, साखर, फॉस्फेट, ग्लुकोज २) रायबोज शर्करा, फॉस्फेट, नत्रयुक्त आम्लारी
३) पेंटोज, फॉस्फेट, नत्रयुक्त आम्लारी ४) नत्रयुक्त आम्लारी, पेंटोज, फॉस्फेरिक ॲसिड, फॉस्फरस.

१७) जठरामध्ये स्रवणारे पेप्सिन आहारातील ...... या पोषकतत्त्वाचे पचन करते.
१) प्रथिने २) स्निग्धे ३) कर्बोदके ४) जीवनसत्त्वे

१८) बॅसिलरी डिसेन्ट्री (आव) खालीलपैकी एका सूक्ष्म जिवाणूंमुळे होते ?

१) साल्मोनेला
२) अ‍ॅन्टेमोबिक हिस्टेलिटिका
३) शिगिला बॅसिलस
४) स्ट्रेप्टोकोकाय

१९) पुढे दिलेल्या विधानांपैकी सत्य विधाने ओळखा.

A) उपचार हे रोगनिदानापूर्वी करावे लागतात.
B) इंटरफेरॉन हे जिवाणूंना मारतात.
C) पोलिओची लस बनविताना अशक्त केलेले पोलिओ विषाणू वापरतात.
D) जनुकीय पारेषित बटाटे खाण्यापूर्वी ते चांगले उकडावे लागतात.
E) PKU हा एक प्रकारचा आनुवंशिक आजार आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) C), E)
२) A), D)
३) B), E)
४) A, B)

२०) धूम्रपानामुळे कोणत्या अवयवाचा कॅन्सर होतो?

१) यकृत
२) फुप्फुस
३) तोंडाचा
४) आतड्यांचा

२१) मनुष्याला रंगआंधळेपणाचा भास आहे असे म्हणता येते जर ........

१) त्याला सर्व प्रतिमा कृष्णधवल दिसतात
२) तो सर्व रंग सामान्यपणे पाहू शकतो.
३) तो काही रंग ओळखू शकत नाही.
४) त्या व्यक्तीच्या दृष्टीपटलावर दंडपेशी नसतात.

२२) खालीलपैकी कोणते डेंग्यु रोगाचे लक्षण नाही ?

अ) खूप ताप येणे
ब) श्वास जोरात चालणे
क) रक्ताच्या उलट्या होणे
ड) दृष्टी कमी होणे

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ)
२) फक्त (ड)
३) (ब) आणि (क)
४) (अ) आणि (क)

२३) तरुण निरोगी व्यक्तीचा सामान्य रक्तदाब ...... असतो.

१) १६०/९०
२) १००/७०
३) १२०/८०
४) १३५/७५

२४) कंठग्रंथातील दोषामुळे कोणता प्रभाव दिसतो ?

१) मतीमंदत्व व शरीराची वाढ खुंटणे
२) स्त्रियांमध्ये पुरुषोचित वैशिष्ट्ये दिसणे
३) व्यक्ती अस्वस्थ व अस्थिर बनते
४) वरीलपैकी कोणतेही नाही

२५) मादक पदार्थांचे अतिसेवन केल्यास ...... निर्माण होते.

१) तरतरी
२) अस्वस्थता
३) हास्य
४) भ्रमोत्पदकता

Study CIRCLE

# १२) चालू घडामोडी

१) २००९ सालचा मिस वर्ल्ड पुरस्कार विजेती कायने अलोरिनो ही कोणत्या देशाची आहे ?
१) ब्राझील २) जिब्राल्टर ३) व्हिएतनाम ४) पेरू

२) चिपको आंदोलनाचे नेतृत्व कोणी केले ?
१) श्रीमती गौरादेवी २) श्री. सुंदरलाल बहुगुणा ३) मेधा पाटकर ४) बाबा आमटे

३) कोणत्या मराठी चित्रपटास २००९ चा प्रादेशिक उत्कृष्ट चित्रपट पुरस्कार प्राप्त झाला ?
१) श्वास २) निरोप ३) नटरंग ४) टिंग्या

४) सध्या अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष म्हणून कोण कार्यरत आहेत ?
१) डॉ. श्रीकुमार बॅनर्जी २) डॉ. अनिल काकोडकर
३) डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ४) यांपैकी कोणीही नाही

५) जागतिक पर्यावरण दिन ...... रोजी साजरा केला जातो.
१) ५ जानेवारी २) ५ जून ३) १४ फेब्रुवारी ४) १५ जानेवारी

६) कुख्यात पाकिस्तानी दहशतवादी अजमल अमीर कसाबला कोणत्या न्यायाधीशाने शिक्षा सुनावली ?
१) न्या. श्रीकृष्ण २) न्या. एम. एल. टाहलियानी
३) न्या. धर्माधिकारी ४) न्या. सावंत

७) 'जी २०' संमेलन २००९ मध्ये कोणत्या ठिकाणी झाले ?
१) लंडन २) न्यूयॉर्क ३) सिडनी ४) दिल्ली

८) पंकज अडवानी कोणत्या खेळाशी संबंधित आहे ?
१) बिलियर्ड्स २) हॉकी ३) टेनिस ४) क्रिकेट

९) दुसरे जागतिक मराठी साहित्य संमेलन ...... येथे झाले.
१) कैरो २) दुबई ३) कराची ४) कुवैत

१०) भारतातील विद्यार्थ्यांवर ...... या देशात अधिक हल्ले झाल्याचे निदर्शनास आले आहे.
१) इंग्लंड २) अमेरिका ३) जर्मनी ४) ऑस्ट्रेलिया

११) फोर्ब्सच्या (सप्टेंबर २००९) सर्वेक्षणानुसार ...... हा भारतातील सर्वांत श्रीमंत आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळाडू आहे.
१) सचिन तेंडुलकर २) युवराज सिंग ३) एम. एस. धोनी ४) जहिर खान

१२) राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून कोणाची निवड करण्यात आली आहे ?
१) लालकृष्ण अडवानी २) शरद यादव ३) नितीन गडकरी ४) सुषमा स्वराज

study CIRCLE

१३) 'नॅशनल डेअरी रिसर्च इन्स्टिट्यूट' (NDRI) हरियाणा येथील वैज्ञानिकांनी जून २००९ मध्ये 'गरीमा' नावाचे ...... क्लोनद्वारे तयार केले.
१) गायीचे वासरू २) म्हशीचे पिल्लू ३) बकरीचे पिल्लू ४) कोंबडीचे पिल्लू

१४) भूतानचे नवे राजे म्हणून कोणाची निवड झाली आहे (२०१०)?
१) जिग्मे सिंगे वांगचूक २) जिग्मे खेसर नामग्याल वांगचूक
३) ल्योंपो खांडू वांगचूक ४) जिग्मे च्युआंग वांगचूक

१५) सध्या भारताचे वाणिज्य व औद्योगिक केंद्रीय मंत्री कोण आहेत ?
१) आनंद शर्मा २) जयपाल रेड्डी ३) फारूक अब्दुल्ला ४) मुकुल वासनिक

१६) ''एमिल'' या पुस्तकाचे लेखक कोण आहेत ?
१) पेस्टॉलाजी २) जीन जेकस रुसो ३) जॉन ड्युई ४) हबर्ट स्पेन्सर

१७) लता मंगेशकर यांना 'ऑफिसर ऑफ द लिजण्ड ऑफ ऑनर' हा सर्वोच्च नागरी सन्मान (२०१०) कोणत्या देशाने दिला?
१) रशिया २) इंग्लंड ३) फ्रान्स ४) स्विडन

१८) नोबेल पुरस्कार व पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित डॉ. नॉर्मन बोरलॉग हे प्रतिभावान व्यक्तिमत्त्व कोणत्या क्षेत्राशी संबंधित होते ?
१) अवकाश २) अणूतंत्रज्ञान ३) अंतराळ संशोधन ४) कृषी

१९) डॉ. जया अरूणाचलम यांना जमनालाल बजाज फाउंडेशन पुरस्कार २००९ पुढील कार्यामुळे प्राप्त झाला.
१) आदिवासी भागात गुन्हेगारी रोखणे २) विज्ञान तंत्रज्ञान साहाय्याने ग्रामीण विकास करणे
३) महिला व मुलांच्या कल्याणासाठी कार्य ४) महात्मा गांधींचा विचार भारताबाहेर पोहचवणे

२०) अलिप्त राष्ट्र चळवळीची (नाम) पंधरावी शिखर परिषद जुलै २००९ मध्ये ...... या देशात संपन्न झाली.
१) कोपेनहेगेन २) इजिप्त ३) चीन ४) फिलिपिन्स

२१) 'ड्रीम्स् फ्रॉम माय फादर' या पुस्तकाचे लेखक कोण ?
१) बेनझीर भुट्टो २) हेलन केलर ३) स्टीफन हॉकिंग ४) बराक ओबामा

२२) महाराष्ट्रात कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ कोठे आहे ?
१) पैठण २) वर्धा ३) रामटेक ४) नांदेड

२३) 'प्रहार' नवाच्या डीआरडीओने विकसित केलेल्या क्षेपणास्त्राची चाचणी वर्ष २०११ मध्ये घेण्यात आली ते क्षेपणास्त्र कसे आहे?
१) लघू पल्ल्याचे जमिनीवरून हवेत मारा करणारे २) दीर्घ पल्ल्याचे जमिनीवरून हवेत मारा करणारे
३) लघू पल्ल्याचे जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे ४) दीर्घ पल्ल्याचे जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे

२४) ''सत्यशोधक'' हे बहुचर्चित नाटक कोणी लिहिले आहे?
१) गो. पु. देशपांडे २) जोतिबा फुले ३) राजीव नाईक ४) धर्मकीर्ती सुमंत

२५) कोणत्या समस्येशी संबंधित जनआंदोलनातून (२०१३) भारतात एका नव्या पक्षाची स्थापना झाली?
१) दहशतवाद २) भूसंपादन ३) नक्षलवाद ४) भ्रष्टाचार

२६) आफ्रिका खंडात गुंतवणूक करणारा आघाडीचा आशियाई देश कोणता (२०१३) ?
१) भारत २) जपान ३) चीन ४) इंडोनेशिया

२७) पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे अध्यक्ष (२०१३) कोण आहेत?
१) एम्. गोविंद राव २) सौमित्र चौधरी ३) सी. रंगराजन् ४) व्ही. एस्. व्यास

२८) २०१२ च्या पूर्वार्धात सर्वाधिक तीव्रतेचा भूकंप कोठे घडला?
१) जपान २) चीन ३) फिलिपीन्स ४) इंडोनेशिया

२९) लंडन येथे २०१२ मध्ये आयोजिलेल्या ऑलिम्पिक क्रीडास्पर्धेत मेरी कोम यांनी कोणते पदक प्राप्त केले?
१) कांस्य २) सुवर्ण ३) रजत ४) यापैकी नाही

३०) हिलरी मँटेल या लेखिकेस (२०१२) कोणता पुरस्कार प्राप्त झाला?
१) बुकर २) नोबेल ३) पुलित्झर ४) कॉमनवेल्थ

३१) सार्क-SAARC - संघटनेचे सभासद देश कोणते?
अ) भारत, रशिया, चीन, जपान, भूतान, मॅनमार
ब) भारत, द. आफ्रिका, इस्राईल, यू.एस.ए., अफगाणिस्तान
क) इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, डेन्मार्क
ड) बांगलादेश, भूतान, नेपाळ, श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान व भारत
**पर्यायी उत्तरे :**
१) अ) २) ड) ३) क) ४) ब)

३२) भारतातील पहिले दूरदर्शन केंद्र कोठे सुरू झाले?
१) दिल्ली २) मुंबई ३) चेन्नई ४) कोलकाता

३३) मुंबई पोलीस दलाचा 'संवाद तुझा माझा' ह उपक्रम ........ संबंधित आहे.
१) ज्येष्ठ नागरिक २) कौटुंबिक विवाद ३) पोलीस जनता संबंध ४) घटस्फोटित जोडपी

३४) भारतीय राज्य घटनेनुसार भारताचा आजचा (२०१३) प्रथम नागरिक कोण आहे ?
१) श्री. प्रणव मुखर्जी २) डॉ. मनमोहन सिंह ३) श्रीमती सोनिया गांधी ४) वरीलपैकी कोणीही नाही.

३५) माजी केंद्रीय सनदी अधिकारी व अनुसूचित जाती–जमाती आयोगाचे माजी आयुक्त डॉ. ब्रह्मदेव शर्मा यांनी स्वेच्छा निवृत्तीनंतर ........ या संघटनेमार्फत छत्तीसगडच्या आदिवासींमध्ये काम सुरू ठेवले आहे.
१) भारत जन आंदोलन २) आदिवासी जन आंदोलन
३) छत्तीसगड जन आंदोलन ४) किसान आदिवासी जन आंदोलन

३६) बांगलादेशातील कोणत्या अर्थतज्ज्ञानी १९७० साली 'मायक्रो क्रेडिट' आंदोलनाची सुरुवात केली ?
१) शेख मोहंम्मद २) मुजीबुर रहमान ३) युनूस खान ४) मोहमंद युनूस

## १३) अध्यापन अभियोग्यता

१) जास्तीत जास्त योग्य गट ओळखा. –
प्रत्येक व्यक्ती ही स्वतः जडण–घडणीदरम्यान सामावून घेतलेले व जिरवलेले अनुभव घेऊनच अध्ययन कृतीत सहभागी होते. यासाठी व्यक्ती अध्ययन प्रक्रियेच्या केंद्रस्थानी असली पाहिजे असा आग्रह धरणाऱ्या अध्यापन तज्ज्ञांचा गट.
१ ) पियाजे, व्हायगॉत्स्की २) स्किनर, ब्रुनर ३) रॉजर्स, स्किनर ४) स्किनर, व्हायगॉत्स्की

२) कोणता पर्याय अत्यावश्यक नाही.
आज शिक्षकी पेशा हा व्यवसाय बनला असून या व्यवसायात व्यक्तीला स्वतःचे स्थान निश्चित करायचे झाल्यास ...... आवश्यक आहे.
१) सतत शिकत राहणे, नव्या क्षमता आत्मसात करणे.
२) विद्यार्थ्यांप्रति तद्नुभूती व समाजाप्रति बांधीलकी जोपासणे.
३) स्वतःच्या कामाचे प्रदर्शन मांडून जास्तीत जास्त पारितोषिके मिळवणे.
४) स्वतःच्या कार्याबाबत सतत विमर्शी चिंतन करणे.

३) जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.
विद्यार्थ्याला विशिष्ट ज्ञान वा कौशल्य प्राप्त करायला मदत देण्याचा विद्यार्थीकेंद्री ज्ञानरचनामार्ग कोणता ?
१) ते कौशल्य तज्ज्ञांमार्फत त्याच्यासमोर दाखवून संबंधित कृती आठवून लिहायला सांगणे.
२) त्या कौशल्याची चित्रफीत दाखवून तशी कृती करायला लावणे.
३) ते कौशल्य काम करता करता आत्मसात व्हावे या दृष्टीने दैनंदिन जीवनाशी निगडीत कार्य–समस्या विद्यार्थ्यांवर सोपवणे.
४) विद्यार्थ्यांना ते कौशल्य पूर्णपणे समजेपर्यंत समजावून सांगणे.

४) जे काही समजले, पटले, स्वीकारले किंवा कितीचे सात्मीकरण झाले याबद्दल प्रतिसाद शिक्षकापर्यंत पोहचवणे म्हणजे ...... होय.
१) प्रसारण २) ग्रहण ३) प्रत्याभरण ४) आकलन

५) उचित पर्याय निवडा.
हृदयाचे कार्य स्पष्ट व्हावे यासाठी अध्यापकाने एक संगणकीय खेळ रचला. अशुद्ध रक्ताचा हृदयात प्रवेश होऊन, त्याचे शुद्धीकरण होऊन, ते हृदयाकडून शरीराकडे जाईपर्यंतच्या सर्व घटनांची क्रमवार विभागणी करून, विद्यार्थी या सर्व घटना सूचनांनुसार क्रिया करून अनुभवेल अशी यात योजना आहे. रक्तप्रवाहाबरोबर जाताना विद्यार्थ्याला माहितीच्या आधारे निर्णय घेऊन खेळी खेळायची आहे. योग्य निर्णयावर क्लिक केल्यावर पुढची चाल मिळते.
हा खेळ रचताना अध्यापकाने विद्यार्थ्याकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहिले आहे ?
१) स्व–प्रत्याभरण प्रणाली २) ज्ञानरचनाक्षम प्रणाली ३) विचारक्षम प्रणाली ४) वरील सर्व

६) विधानपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.
अध्यापन कार्यासाठी वैज्ञानिक पद्धतीने उपलब्ध केलेल्या ज्ञानधारांची गरज आहे कारण ते अध्यापकाला विद्यार्थी व त्याचे संदर्भ, विशिष्ट विद्याशाखा व संबंधित ज्ञाननिर्मिती प्रक्रिया, अध्ययन व व्यक्तिमत्त्व विकास इत्यादींबाबत......
१) विस्तृत माहिती देतात व अध्यापन तज्ज्ञ बनवितात.
२) अंतःदृष्टी मिळवून तज्ज्ञ व्हायला साहाय्य देतात.
३) विस्तृत माहिती देऊन संशोधन करण्याची प्रेरणा देतात.
४) अंतःदृष्टी प्राप्त करून वेळोवेळी उचित निर्णय घेण्याबाबत साहाय्य करतात.

७) विधानपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.–
अभ्यासक्रम ध्येये ही ......
१) व्यक्तीला समाजाचा एक जबाबदार ज्ञानकर्मी घटक म्हणून घडायला साहाय्य देण्याशी निगडित असतात.
२) सर्वांना परीक्षा देणे सोपे जाण्याशी निगडित असतात.
३) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत बुद्धिमत्ता कलाशी व अध्ययन शैलींशी निगडित असतात.
४) अध्यापकांना उपक्रम सहजपणे राबवता येण्याशी निगडित असतात.

८) विधानपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.
अध्ययन प्रक्रिया व्यक्तीला ......
१) स्वतःच्या क्षमतांची व्याप्ती व खोली वाढविण्याच्या संधी उपलब्ध करते.
२) स्वतःसाठी कायमस्वरूपी नोकरीची हमी, भरपूर मोबदला व प्रतिष्ठा उपलब्ध करते.
३) स्वतःच्या सामर्थ्याची गुणवत्ता वाढविणारी, दुबळेपणावर मात करण्याला उपयुक्त ठरणारी कौशल्ये प्राप्त करण्याच्या संधी उपलब्ध करते.
४) स्वतःच्या क्षमतांची गुणवत्ता वाढवून त्यांचा समाजासाठी उपयोग करण्याच्या संधी उपलब्ध करते.

९) वर्णन करणारा जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा –
प्रकल्प अध्ययन पद्धत : ......
१) पर्याय (२), (३) व (४) योग्य
२) व्यक्तीला विविध विद्याशाखांच्या एकात्मिक अध्ययनसंधी उपलब्ध करते.
३) व्यक्तीसमूहातील सहभागींना व्यक्तिगत बुद्धिमत्ता कल व अध्ययनशैली यानुसार अध्ययन अवकाश उपलब्ध करते.
४) अध्यापकाला विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व सामूहिक स्वरूपाच्या कार्य व निर्मिती प्रक्रियांचे मूल्यमापन करण्याच्या संधी उपलब्ध करते.

१०) कार्यकारणपूर्तीसाठी जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.
अध्ययन करताना विद्यार्थ्याला स्वतःच्या रुचीचा शोध घ्यायला प्रेरित करून त्या रुचीची पातळी बोधात्मक कृतिक्षमतेपर्यंत न्यायला साहाय्य देणे ही सुकरकाची (ऋरलळश्रळींरीं) जबाबदारी आहे, कारण रुची घेऊन काम करणाऱ्या .............
१) व्यक्तीच्या निर्मितीचा दर्जा नेहमीच उत्तम असतो.
२) व्यक्तीला तणावाशिवाय निर्मितीचा दर्जा उच्च राखण्याच्या दृष्टीने कौशल्ये आत्मसात करणे शक्य होते.
३) व्यक्ती तणावाशिवाय समाजोपयोगी निर्मिती करतातच.
४) व्यक्तीला तिच्या निर्मितीसाठी समाजात सन्मान मिळतो.

११) जास्तीत जास्त अचूक पारिभाषिक संज्ञा निवडा.
मराठी भाषेतील वाक्यरचना नियमांचा, इंग्रजी भाषा वाक्यरचना करण्यावर प्रतिकूल परिणाम होत असेल, तर अशा स्वरूपाच्या अध्ययन संक्रमणाचे वर्णन मनोविज्ञानात कोणत्या विशेषणाने करतात ?
१) ऋण २) शून्य ३) धन ४) गैर

## १४) संशोधन अभियोग्यता

१) उचित पर्याय निवडा.
अमूर्त पातळीवरील आशय संघटकाच्या विविध पैलूंचे अर्थपूर्ण संघटन करण्याच्या बोधात्मक क्षमतेचा विकास हे कोणत्या प्रतिमानाचे ध्येय आहे.
१) अग्रत संघटक २) संबोध प्राप्ती ३) उद्‌गमन विचार ४) पृच्छा प्रशिक्षण

२) परिकल्पना म्हणजे ......
१) अनुभव, अभ्यास व तर्क या तिन्हीवर आधारित असे समस्येचे संभाव्य उत्तर.
२) समस्येबाबत संशोधकाचा असलेला अपरिपक्व दृष्टिकोन.
३) समस्येवर संशोधकाने काढलेला तोडगा.
४) चलांमधील संबंधांचे विधान.

३) कार्यात्मक व्याख्येत ...... महत्त्वाचे असते.
१) उजळणी २) संकल्पना निर्मिती ३) विश्वसनीयता ४) सप्रमाणता

४) वाक्यपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.
संशोधन कार्य करताना आपण लेखनचौर्य करतो आहोत याचे भान अनेक संशोधकांना नसते कारण ......
१) बौद्धिक संपत्तीचे स्वामित्व ही संकल्पना त्यांना माहीत नसते.
२) स्वतः कधीही स्वतंत्रपणे लेखन केले नसल्याने बौद्धिक संपत्तीच्या स्वामित्वाचा त्यांना आदर वाटत नाही.
३) ज्याचे श्रेय त्याला दिले पाहिजे ही वृत्ती नसते.
४) वरील सर्व

५) जास्तीत जास्त पर्याय निवडून विधानपूर्ती करा.
राष्ट्रीय मूल्यमापन व अधिस्वीकृती परिषदेचे मुख्य कार्य म्हणजे ......
१) संस्थेला स्वतःची ध्येये व ती गाठण्यासाठी राबवलेली धोरणे यांचे स्वयं-मूल्यनिर्धारण करण्यासाठी साहाय्य देणे.
२) संस्थेने स्वतःची ध्येये व ती गाठण्यासाठी केलेले उपक्रम याबाबत केलेले दावे सिद्ध करण्याच्या संधी उपलब्ध करणे.
३) संस्थेने स्वतःची ध्येये व ती गाठण्यासाठी केलेले उपक्रम यांच्यातील सुसंगतीच्या आधारे श्रेणी प्रदान करणे.
४) संस्थेला स्वतःची ध्येये व ती गाठण्यासाठी केलेल्या उपक्रमांबाबतच्या स्वयं-मूल्यनिर्धारणाच्या आधारे श्रेणी प्रदान करणे.

६) सतत सर्वंकष मूल्यमापनासंदर्भातील कोणता विधानसंच जास्तीत जास्त योग्य आहे.

**विधाने :**

A) हे मूल्यमापन व्यक्ती व व्यक्तिसमूहांना, ते करत असलेल्या निर्मिती प्रक्रिया व निर्मिती यांच्यासंदर्भात प्रत्याभरण करते.

B)हे मूल्यमापन व्यक्ती व व्यक्तिसमूहांची गुणवत्ता ठरवून कोणाला पुढे जाऊ द्यायचे वा वगळायचे ते ठरविते.

C)हे मूल्यमापन व्यक्ती व व्यक्ती समूहांना स्वतः करत असलेल्या निर्मिती प्रक्रिया व निर्मिती यांची गुणवत्ता ठरविण्याचे आवाहन करते.

D) हे मूल्यमापन व्यक्ती व व्यक्तिसमूहांना परस्परांच्या निर्मिती प्रक्रिया व निर्मिती यांची गुणवत्ता निर्धारित करण्याच्या संधी उपलब्ध करते.

**पर्यायी उत्तरे :**

1) A, B आणि C  2) A, C आणि D  3) B, C आणि D  ४) सर्व विधाने

## १५) वाचन आकलन, आधारसामग्री अर्थउकल

✻ **पुढील उतारा वाचून १ ते ५ क्रमांकाच्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

''संपत्तीचे प्रवाह'' या आपल्या निबंधामध्ये जॉन रक्सिन या इंग्रज विचारवंताने लिहिले आहे – ''सामाजिक अर्थशास्त्र (राष्ट्राचे अर्थशास्त्र) म्हणजे सुखकर व उपयुक्त वस्तू योग्य वेळी व योग्य स्थळी कशा निर्माण कराव्यात आणि त्यांची विभागणी न्याय्य रीतीने कशी करावी यासंबंधीचे शास्त्र होय.'' या विचाराचे स्पष्टीकरण करताना रक्सिन यांनी लिहिले आहे – ''आपल्या पिकाची योग्य वेळी कापणी करणारा शेतकरी, जहाजे बांधणारा सुतार, उत्तम विटा बनविणारा गवंडी, स्वयंपाक घर सांभाळणारी गृहिणी आणि आपला गळा सांभाळून सुस्वर गाणारी गायिका हे राष्ट्राच्या संपत्तीत व हितात सतत भर टाकीत असतात.'' रक्सिन यांनी व्यापारी अर्थशास्त्रावर टीका करताना लिहिले आहे – 'व्यापारी अर्थशास्त्र हे पैसे संपादण्याचे शास्त्र आहे. त्यामुळे इतरांचे श्रम विकत घेण्याची सत्ता काही व्यक्तींना हाती येते आणि त्यामुळे एका पक्षास संपत्ती व सत्ता प्राप्त होते आणि दुसऱ्या बाजूला कष्ट करणाऱ्या पक्षाला दैन्य भोगावे लागते.' रक्सिन यांनी म्हटले आहे, की श्रीमंत होणे म्हणजेच कमालीची विषमता निर्माण करण्याची कला आहे. त्यांनी लिहिले आहे – 'दुसऱ्यांच्या श्रमांवर हक्क निर्माण करणारी व्यापारी संपत्ती समाजात दिसू लागली याचा अर्थ, खऱ्या गरजूंना उपयुक्त व आवश्यक अशा संपत्तीची तेथे वाण पडली असा होतो.' खऱ्या संपत्तीमुळे राष्ट्रात भरदार छातीचे, पाणीदार डोळ्यांचे आणि उल्हसित अंतःकरणाचे असंख्य लोक निर्माण होतात... राष्ट्रातील सर्व कारखान्यांत उत्कृष्ट प्रतीचे आत्मे निर्माण करणारा कारखानाच अधिक किफायतशीर होईल.'

१) जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

गांधीजींच्या विचारांवर रस्किन यांच्या विचारांचा प्रभाव होतो असे स्पष्ट दिसते कारण ......

१) उत्पादक शारीरिक श्रमांना प्रतिष्ठा असली पाहिजे हा गांधीजींचा आग्रह होता.

२) अर्थव्यवस्थेमध्ये समाजातील सर्व घटकांचे सहकार्य असले पाहिजे व कोणाचेही शोषण होता कामा नये ही गांधीजींची भूमिका होती.

३) सर्व लोकांच्या किमान गरजा पूर्ण करण्याला आवश्यक संपत्ती देशात आहे असे गांधीजींचे सांगणे होते.

४) (१), (२) व (३) ही सर्व कारणे योग्य.

२) विधानपूर्ती करण्यासाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.
जॉन रस्किन यांच्या मते सामाजिक अर्थशास्त्र म्हणजे ......
१) चैनीच्या व दैनंदिन गरजेच्या वस्तू योग्य वेळी व योग्य स्थळी निर्माण करून त्यांचे सर्वांना गरजेनुसार वाटप करण्याचे शास्त्र होय.
२) जेव्हा गरज आहे, जेथे गरज आहे, ती भागविण्यासाठी योग्य अशा वस्तूंची निर्मिती करून त्यांचे सर्वांना आवश्यकतेनुसार वाटप करण्याचे शास्त्र आहे.
३) आरामात जगता येण्यासाठी आवश्यक अशा वस्तूंची गरजेनुसार निर्मिती करून त्यांचे सर्वांना वाटप करण्याचे शास्त्र होय.
४) सुख देणाऱ्या वस्तूंची भरपूर प्रमाणात निर्मिती करून कोणालाही वाण पडणार नाही हे पाहण्याचे शास्त्र आहे.

३) जास्तीत जास्त उचित पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.
श्रम विकत घेण्याची सत्ता काहींना प्राप्त झाली की श्रम करणाऱ्यांना दैन्यावस्था भोगावी लागते याचे उत्तम उदाहरण म्हणजे......
१) शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारी दैन्यावस्था होय.
२) शेती व्यवसायात गुंतलेल्या बांधवांना स्वतःच्या श्रमाचा वाजवी मोबदला न मिळणे होय.
३) सतत पगारवाढ घेत त्या जोरावर संपत्ती एकवटणारे सरकारी नोकर व लोकप्रतिनिधी व श्रम करून मूलभूत गरजाही न मिळवू शकणारी जनता होय.
४) सर्वच असंघटित कष्टकऱ्यांच्या वाट्याला येणारी दैन्यावस्था होय.

४) जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.
घर सांभाळणारी गृहिणी राष्ट्राच्या संपत्तीत व हितात भर टाकते कारण ......
१) ती कामाच्या ठिकाणी जाऊन गरजूंची जागा अडवत नाही.
२) ती कुटुंबीयांसाठी योग्य वेळी, गरजेनुसार योग्य प्रकारची सेवा देते व त्यामुळे कुटुंबीय उत्पादनात उच्च दर्जाचा सहभाग देतात.
३) ती स्वतःच्या इच्छा व आकांक्षा बाजूला ठेवून कुटुंबीयांची सेवा करते.
४) ती कुटुंबीयांसाठी राबून एकप्रकारे संपत्तीची बचत करते व कुटुंबीयांची संपत्ती वाढविते.

५) वाक्यपूर्तीसाठी जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.
दुसऱ्यांच्या शारीरिक श्रमांना कवडीमोलाने विकत घेणारी संपत्ती म्हणजे ......
१) समाजाच्या आर्थिक उन्नतीचे लक्षण आहे.
२) समाजाच्या आर्थिक अवनतीचे लक्षण आहे.
३) समाजाच्या खऱ्या गरजूंना आवश्यक संपत्ती मिळत नसल्याचे लक्षण आहे.
४) समाजात कमालीची विषमता असल्याचे लक्षण आहे.

✻ **पुढील उतारा वाचून ६ ते १० क्रमांकाच्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

खरं तर अभ्यासक्रमातील सगळंच्या सगळं लक्षात ठेवण्याची गरज नसते. त्यातील बराचसा भाग हा केवळ अंदाजाने किंवा तर्काने सांगता येतो. काही भाग महत्त्वाचा नसल्यामुळे तो लक्षात ठेवण्याची गरज नसते. म्हणजे लक्षात ठेवण्याचा पाठ्यभाग खरं म्हणजे बराच कमी असतो. तुम्ही अभ्यास करताना धड्याचं नाव वाचता आणि लगेच वाचायला सुरुवात करता. त्याऐवजी धड्याचं नाव वाचल्यावर त्या नावावरून त्या धड्यात काय दिलं असेल याचा तर्क किंवा अंदाज बांधा. त्यानंतर धडा वाचायला सुरुवात करा. त्याचप्रमाणं धड्यामध्ये शीर्षकं व उपशीर्षक दिलेली असतात. ती वाचल्यावरसुद्धा लगेच

परिच्छेद वाचण्यास सुरुवात करू नका. त्या शीर्षकावरून किंवा उपशीर्षकावरून पुढे काय माहिती दिली असेल याचा अंदाज करा. यानंतर तो परिच्छेद वाचा. तुम्ही असा प्रयत्न केला तर तुम्हांला असं दिसून येईल की त्या धड्यात काय दिलंय त्यातील ३० ते ५० टक्के तुम्ही अंदाजानं सांगू शकता. यामुळं अभ्यासातील तुम्हांला जे लक्षात ठेवायचंय त्याचा जवळ जवळ निम्मा बोजा कमी होतो. काही वेळेला तर्कानं तुम्हांला जे कळलेलं असतं, ते पुस्तकात विशिष्ट भाषेत मांडलेलं असतं. पुस्तकातील विशिष्ट भाषेत तंतोतंतपणे सांगता आलं नाही म्हणजे तुम्हांला समजलं नाही हा तुमचा गैरसमज आहे. तो प्रथम दूर करा. तर्क करण्याच्या सरावानं तुमच्या आकलनात वाढ होते. सरावानं आणि हळूहळू पुस्तकातील विशिष्ट भाषेतही तुम्हांला सांगता येतं. अरे शिकणं म्हणजे तरी काय ? Correct guessing is learning. बरोबर अंदाज करणं म्हणजे शिकणं.

६) जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.
अभ्यासक्रमातील (पाठ्यक्रमातील) सगळं लक्षात ठेवण्याची गरज नसते कारण ......
१) सगळा भाग दैनंदिन जीवनात उपयोगी नसतो. २) सर्व भाग लक्षात ठेवणे मेंदूच्या आवाक्याबाहेरचे असते.
३) तर्क-अंदाजाने बराचसा भाग आपल्या लक्षात राहतो. ४) सर्व भाग परीक्षेत विचारला जात नाही.

७) विधानपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.
जर साहित्याला शीर्षक नसेल तर ......
१) त्यावर नजर टाकून त्यातील काही शब्दांच्या आधारे तर्क बांधावा.
२) तसे साहित्य वाचणे टाळावे म्हणजे वेळ वाया जाणार नाही.
३) ते काळजीपूर्वक वाचून त्यातील महत्त्वाचे शब्द अधोरेखित करावेत.
४) वरील सर्व कृती योग्य आहेत.

८) जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडून विधानपूर्ती करा.
जर पुस्तकात मांडलेलं त्याच शब्दात तंतोतंत सांगता आलं नाही तर त्याचा अर्थ ...... असा होतो.
१) ...... आपल्याला त्या साहित्याचे आकलन झालेले नाही ......
२) ...... आपल्याला आकलन झालेले आहे परंतु लेखकाच्या भाषेवर वा विषयाच्या परिभाषेवर आपले प्रभुत्व नाही.
३) ...... त्या भाषेतील साहित्य स्वतंत्रपणे अभ्यासायला आपण पात्र नाही ......
४) ...... अशा भाषेतील साहित्य वाचण्यात वेळ घालवणे मूर्खपणाचे आहे ......

९) विधान पूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.
साहित्याच्या शीर्षकावरून अथवा त्यातील काही शब्दावरून त्या साहित्याविषयी अंदाज बांधणे आपल्याला शक्य होते कारणः
१) त्या शब्दाचे सर्व अर्थ आपल्याला माहीत असतात.
२) शब्द वाचताच त्यासंबंधीचे आपले अर्थ व अनुभव जागृत होतात.
३) त्या शब्दाच्या अर्थासंदर्भात आपण अनुभव घेतलेले असतात.
४) त्या शब्दातून सूचित होणाऱ्या अर्थासंबंधी आपण त्यापूर्वी काही वाचलेले वा ऐकलेले असते.

१०) साहित्याचे आकलन होण्यासाठी ते वाचायला सुरुवात करताना पुढीलपैकी कोणती कृती करणे जास्त योग्य ठरेल?
१) त्या साहित्यासाठी परीक्षेत किती टक्के गुण राखून ठेवले आहेत हे पाहणे.
२) त्या साहित्यावर परीक्षेत कोणत्या स्वरूपाचे प्रश्न विचारतात हे पाहणे.
३) साहित्याचा शब्द-न्-शब्द वाचून नवीन शब्दांचे अर्थ कोशात पाहणे.
४) त्या साहित्याच्या शीर्षकावरून त्यात काय दिले असेल याचा अंदाज बांधणे.

## आधारसामग्री अर्थउकल

१) शून्य परिकल्पनेचा त्याग केव्हा केला जाईल ?
१) .०५ स्तरावर उठ ची किंमत १.९६ किंवा १.९६ पेक्षा अधिक मिळाल्यास.
२) .०५ स्तरावर उठ ची किंमत १.९६ किंवा १.९६ पेक्षा कमी मिळाल्यास.
३) .०१ स्तरावर उठ ची किंमत २.५८ किंवा २.५८ पेक्षा कमी मिळाल्यास.
४) सांगता येत नाही.

२) दोन चल राशीतील संबंधाचे स्वरूप दर्शविणाऱ्या अचल अंकास ...... असे म्हणतात.
१) केंद्रीय प्रवृत्ती २) सहसंबंध गुणक ३) प्रमाणक ४) शततमक

३) $$mdn = L + i\left[\frac{N/_2 - F}{f}\right]$$

वरील सूत्रात i चा अर्थ काय ?
१) मध्यांक ज्या वर्गांतरात येतो त्या वर्गांतराची वारंवारता
२) ज्या वर्गांतरात मध्यांक आहे त्याची निचतम मर्यादा.
३) वर्गांतर लांबी
४) ज्या वर्गांतरात मध्यांक आहे त्या वर्गांतराच्या खालच्या वर्गांतरापर्यंतची संचयी वारंवारता

४) एखाद्या कसोटीद्वारे ज्या क्षमतेचे मापन करावयाचे ठरविले असेल, त्या कसोटीद्वारे त्याच क्षमतेचे मापन अचूकपणे होत असेल, तर ती कसोटी ...... आहे असे म्हणता येईल.
१) विश्वसनीय २) पर्याप्त ३) सप्रमाण ४) पर्याप्त व विश्वसनीय

५) मिळालेल्या फलितांच्या कारणांची चर्चा ...... करणे योग्य ठरेल.
१) निष्कर्षात २) शिफारशीत ३) अर्थनिर्वचनात ४) निरीक्षणात

६) सांख्यिकीय व प्रशासकीय कामांसाठी ...... या कार्यक्रमांचा वापर केला जातो.
१) एम. एस. एक्सेल २) एम. एस. वर्ड ३) एम. एस. पॉवरपॉईंट ४) विंडोज एक्सप्लोर

७) अनुमानात्मक संख्याशास्त्राच्या आधारे ......
१) निवडलेल्या नमुन्यावरून संपूर्ण जनसंख्येच्या संबंधात निष्कर्ष काढता येतात.
२) निवडलेल्या नमुन्यापुरतेच निष्कर्ष काढता येतात.
३) निवडलेल्या जनसंख्येच्या विभाजनाच्या गुणवैशिष्ट्यांवरून निष्कर्ष काढता येतात.
४) निवडलेल्या नमुन्यातील काही ठरावीक जनसंख्येच्या संबंधात निष्कर्ष काढता येतात.

८) उचित पर्याय निवडा.
एखादा विशिष्ट गुणांक विस्तार दिला, तर त्यात किती प्राप्तांक येतील, एखादा विशिष्ट प्राप्तांक दिला, तर त्यापेक्षा जास्त किंवा कमी गुण मिळविणाऱ्यांची संख्या किती, या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी पुढीलपैकी कशाचा उपयोग होतो ?
१) प्रमाण विचलन २) प्रसामान्य संभवता वक्र ३) सरासरी विचलन ४) स्तंभालेख

९) एखाद्या घटनेचा गृहीत परिणाम किंवा कारण म्हणजे ...... होय.
१) आश्रयी चल  २) बाह्य चल  ३) स्वाश्रयी चल  ४) स्वतंत्र चल

१०) दोनापेक्षा अधिक मध्यमानातील फरकांचे परीक्षण करण्यासाठी खालीलपैकी कोणत्या परीक्षिकेचा उपयोग केला जातो ?
1) F - परीक्षिका  2) $x^2$ - परीक्षिका  3) t - परीक्षिका  ४) प्रसरण विश्लेषण

११) रिकाम्या जागेसाठी जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.
एखाद्या घटनेविषयी, संस्थेविषयी वा काळाविषयी लिहून ठेवलेली माहिती ही तुलनेने ...... असणारी आधारसामग्री असते.
१) प्राथमिक व उच्च सप्रमाणता  २) दुय्यम व उच्च सप्रमाणता
३) दुय्यम व निम्न सप्रमाणता  ४) प्राथमिक व निम्न सप्रमाणता

## १६) संप्रेषण, माहिती व संज्ञापन तंत्रज्ञान

१) संदेशवहनाची प्रक्रिया विशिष्ट पायऱ्यांनीच होते असे मानले, तर त्यासाठी प्रथम ......
१) प्रेषकाकडून त्याचे सांकेतीकरण व्हावे लागते.
२) ग्राहकांकडून त्याचे सांकेतीकरण व्हावे लागते.
३) प्रेषकाकडून उचित माध्यमाद्वारे त्याचे सांकेतीकरण व्हावे लागते.
४) ग्राहकाकडून उचित माध्यमांद्वारे त्याचे सांकेतीकरण व्हावे लागते.

२) संप्रेषण प्रक्रियेत प्रेषकाच्या कार्याचा योग्य क्रम निवडा.
१) माध्यमाची निवड, सांकेतिकीकरण, माहितीचे संकलन, माहितीचे सुसूत्रीकरण.
२) माहितीचे संकलन, माहितीचे सुसूत्रीकरण, सांकेतिकीकरण, माध्यमाची निवड.
३) माहितीचे संकलन, सांकेतिकीकरण, माहितीचे सुसूत्रीकरण, माध्यमाची निवड.
४) माहितीचे संकलन, माहितीचे सुसूत्रीकरण, माध्यमाची निवड, सांकेतिकीकरण.

३) संप्रेषण पूर्ण होण्यासाठी ...... हे घटक आवश्यक आहेत.
१) प्रत्याभरण, ग्राहक, माध्यम, प्रेषक, संकलन  २) प्रेषक, संदेश, ग्राहक, प्रत्याभरण, अन्वय
३) संदेश, प्रेषक, माध्यम, ग्राहक, प्रत्याभरण  ४) प्रेषक, संदेश, ग्राहक, सांकेतिकीकरण, प्रत्याभरण

४) जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.
परिणामकारक संप्रेषण हे निश्चितपणे ...... असायला हवे.
१) बहुमार्गी, ताठर  २) एकमार्गी, ताठर  ३) बहुमार्गी, गतिमान  ४) एकमार्गी, गतिमान

५) जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.
गुंडाळ फलकांच्या वा अन्य फलकांच्या तुलनेत पॉवरपॉईंट सादरीकरण उपयुक्त ठरते कारण ......
१) विषयसाहित्य प्रभावीपणे ग्राहकापर्यंत पोहोचते.
२) शाब्दिक संप्रेषणादरम्यानच्या त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने आरेखने व चलचित्रमालिकांचा काही प्रमाणात उपयोग होतो.
३) ग्राहकांना माहिती लक्षात ठेवणे सुलभ होते.
४) रंगीत आरेखने व चलचित्रमालिका यांच्या मदतीने ग्राहकांचे अवधान खिळवून ठेवता येते.

६) जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.
संप्रेषण प्रक्रिया अपेक्षेप्रमाणे होते वा नाही याची चाचपणी करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे ......
१) विद्यार्थ्याला संदेशाची पुनरावृत्ती करायला लावणे.
२) विद्यार्थ्याला तो करत असलेली विसांकेतीकरण प्रक्रिया मोठ्याने बोलून दाखवण्यास सांगणे.
३) विद्यार्थ्याला संदेशाधारित प्रक्रिया करायला लावून त्याची कारणमीमांसा मोठ्याने बोलून दाखवण्यास सांगणे.
४) वरीलपैकी एकही योग्य नाही.

७) वाक्यपूर्तीसाठी उचित पर्याय निवडा.
समूह संप्रेषण प्रभावी झाले असे तेव्हाच म्हणता येईल जेव्हा,
१) सर्व समूह सदस्य संबंधित संदेश यथातत्य आठवू शकतील.
२) निश्चित केलेल्या टक्केवारीइतके वा त्याहून अधिक समूह सदस्य संबंधित संदेश यथातथ्य आठवू शकतील.
३) सर्व समूह सदस्य संदेशाद्वारे अपेक्षित वर्तन बदल दाखवतील.
४) अपेक्षित टक्केवारीइतके वा त्याहून अधिक समूह सदस्य अपेक्षित वर्तनबदल दाखवतील.

८) शिक्षकांनी मुख्याध्यापकांना दिलेला अभिप्राय, हे ...... संप्रेषण होय.
१) उर्ध्वगामी २) समस्त ३) अधोगामी ४) वरीलपैकी कोणतेही नाही

९) कोणत्या तारखेपासून महाविद्यालयाला सुट्टी लागणार आहे. पुन्हा आरंभ केव्हा होणार आहे. यासारख्या सूचना देणे म्हणजे ...... स्वरूपाचे संप्रेषण होय.
१) तांत्रिक २) प्रथायुक्त ३) अधिकृत ४) कृती

*१०) संप्रेषण प्रक्रियेत माध्यमाचा व्यक्तीवर ...... परिणाम होतो.*
*१) मानसिक २) बोधात्मक ३) आकलनात्मक ४) भावनिक*

११) विद्यार्थ्यांच्या आजारपणामुळे त्याला चिंता वाटते, त्यामुळे संप्रेषणात अडथळा निर्माण होतो.
वरील उदाहरणात कोणत्या प्रकारचा अडथळा निर्माण होतो ?
१) पार्श्वभूमी-कायिक (काया शरीर) २) माध्यम-कायिक
३) मनोकायिक ४) भौतिक-कायिक

१२) कोणत्याही समस्येचे, प्रश्नाचे, विषयांशाचे सर्वांनी मिळून केलेले सर्वांगीण विवेचन, विश्लेषण, मूल्यमापन म्हणजे ...... पद्धती होय.
१) समालोचन २) व्याख्यान ३) समवाय ४) चर्चा

१३) लहान गटातील चर्चेसाठी ...... पद्धती उपयुक्त ठरते.
१) चर्चासत्र २) परिसंवाद ३) बुद्धिमंथन ४) पथक चर्चा

१४) जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.
गुणवत्ता शोध घेण्याच्या दृष्टीने घेण्याच्या मुलाखतीचे पुढीलपैकी कोणते स्वरूप असणे आवश्यक आहे ?
१) असंरचित, सखोल व मुक्त २) संरचित, उथळ व मुक्त
३) असंरचित, उथळ व बंदिस्त ४) संरचित, सखोल व बंदिस्त

## माहिती व संज्ञापन तंत्रज्ञान

१) प्रक्रिया करून उपयुक्त केलेल्या डाटाच्या संचाला ...... म्हणतात.
१) डेटा २) माहिती ३) तंत्रज्ञान ४) मोडेम

२) शासनाच्या कामकाजातील पत्र–व्यवहारासाठी ई–मेल सुविधेचा वापर पुढीलपैकी कोणत्या बाबींसाठी उपयुक्त नाही?
१) प्रशासनाच्या सर्व स्तरावर माहिती तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून शासकीय कामकाजाची कार्यक्षमता वाढविणे.
२) विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना संगणकाची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणे.
३) जनतेस सत्वर सेवा उपलब्ध करून देणे.
४) मनुष्यबळ, वेळ व पैशाचा सतत होणारा अपव्यय टाळणे.

३) जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.
जगाच्या विविध भागातील लोकांचे व्यक्तिगत संगणक आंतरजालाच्या (internet) सुविधेने परस्परांशी जोडले आहेत. यामुळे तयार झालेल्या सामाजिक सेतुजालाच्या फायद्यांचे स्वरूप काय आहे ?
१) आंतर व्यक्तिक संवादात वाढ २) अनेक विधायक कामांसाठी दबावगटांची निर्मिती
३) अनेकांना स्वतंत्रपणे ज्ञानार्जनाच्या संधी ४) वरील सर्व

४) वेब पेज तयार करण्यासाठी ...... भाषा वापरतात.
1) HTML 2) BASIC 3) COBOL 4) FORTRAN

५) नेटवर्कमध्ये अनेक लहान संगणक एका मध्यवर्ती संगणकाबरोबर सरळ जोडण्यात येतात अशा नेटवर्कला ...... म्हणतात.
१) स्टार नेटवर्क २) बस नेटवर्क ३) रिंग नेटवर्क ४) वरीलपैकी सर्व

६) कोणता पर्याय उचित नाही ?
इ–मेल सुविधेचा उपयोग करणे अनेकांना सोयीचे वाटते कारण ......
१) कमी वेळात संदेश वहन होते.
२) बहुमाध्यम संदेश देता येतो.
३) काटेकोरपणे लेखन–नियम वापरण्याची आवश्यकता नसते.
४) संदेश आदान–प्रदान सहजपणे साठवता येते.

७) जे संगणक माहिती दुसऱ्या संगणकाकडे वळवितात, त्यांना ...... म्हणतात.
१) टोपॉलॉजी २) होस्ट ३) राऊटर्स ४) बॅकबोन्स

८) शिक्षक वर्गात संगणकाच्या आधारे हृदयाची रचना व्हिडिओ क्लीपच्या माध्यमातून दाखवितात. यातील मृदुसाहित्य कोणते आहे ?
१) व्हिडिओ क्लिपवरून विद्यार्थ्यांना पाहण्यास मिळणारी कार्यरचना २) संगणक व त्याचा कळफलक
३) संगणक व व्हिडिओ क्लीप ४) वरीलपैकी कोणतेही नाही

## १७) उच्च शिक्षण पद्धती

१) विद्यापीठ अनुदान आयोग (U.G.C.) केव्हा स्थापन झाला ?
१) १९२१ २) १९५३ ३) १९४८ ४) १९५६

२) यु.जी.सी.ने समाज कार्य शिक्षणांसाठी तिसरी आढावा समिती (Third Review Committee) कोणत्या साली स्थापन केली?
१) २००० २) २००१ ३) २००२ ४) २००३

३) विद्यापीठाचे पदसिद्ध कुलपती कोण असतात ?
१) मुख्यमंत्री २) राज्यपाल ३) राष्ट्रपती ४) कुलगुरू

४) देशातील शालेय आणि उच्चशिक्षणाचे प्रशासन हे कोणत्या मंत्रालयाच्या अखत्यारीत येते ?
१) मानव संसाधन विकास मंत्रालय २) सूचना (माहिती) आणि प्रसारण मंत्रालय
३) महिला आणि बालविकास मंत्रालय ४) युवक कार्यक्रम आणि खेळ मंत्रालय

५) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची खालीलपैकी उद्दिष्टे कोणती ?
१) प्रगत प्रशिक्षणाचे आयोजन करणे २) ज्ञान प्रसार करणे
३) शैक्षणिक समस्यांचे निराकरण करणे ४) वरील सर्व

६) ठरावीक चाकोरीतून शासनाच्या ध्येय-धोरणानुसार दिले जाणारे शिक्षण म्हणजे ......
१) औपचारिक शिक्षण २) अनौपचारिक शिक्षण ३) दूर शिक्षण ४) सहज शिक्षण

७) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (NCERT) ...... हे पदसिद्ध अध्यक्ष असतात.
१) मानवी संसाधन खात्याचे मंत्री २) राज्यांचे उच्च शिक्षणमंत्री
३) विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्ष ४) संस्थेचे सचिव

८) विधानपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.
ज्ञानाधिष्ठित समाज घडविण्याच्या दृष्टीने विकसित केलेल्या शिक्षणप्रणालीत ......
१) विद्यार्थ्यांची मूलभूत ज्ञानार्जन व ज्ञाननिर्मिती कौशल्ये विकसित करण्याला प्राधान्य दिले जाते.
२) विद्यार्थ्यांनी विविध विद्याशाखांचा आशय प्राप्त करण्याला प्राधान्य दिले जाते.
३) विद्यार्थ्यांना समूहाने व वैयक्तिकरीत्या कार्यरत राहून ज्ञानार्जन व ज्ञाननिर्मिती करण्यात सहभाग देण्याची कौशल्ये आत्मसात करण्याला प्राधान्य दिले जाते.
४) विविध कलास्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांना स्वतःच्या विविध गुणांचे प्रकटीकरण करण्याच्या संधी देण्याला प्राधान्य दिले जाते.

## १८) गृहविज्ञान -पोषक आहार, उपचारशास्त्रीय अन्न

१) राष्ट्रीय शालेय भोजन नियमात नमूद केल्यानुसार पेय म्हणून कोणत्या गोष्टीचा समावेश असावा ?
१) १ कप चहा २) १/२ ग्लास संपूर्ण दूध
३) १ कप उसाचा रस ४) १ कप टोमॅटो सूप

२) बॉडी मास इंडेक्स (BMI) मोजण्याचे सूत्र ...... आहे.

१) वजन (किलोग्रॅम)/उंची (सें.मी.) २) वजन (किलोग्रॅम)/उंची² (मीटर)

३) उंची (मीटर)/वजन (किलोग्रॅम) ४) उंची (मीटर)/वजन² (किलोग्रॅम)

३) मादक पदार्थाचे सेवन केल्यामुळे ........... येते त्यामुळे थोडावेळ वेगळ्या प्रकारचा आनंद मिळतो.

१) तरतरी २) हुशारी ३) तजेली ४) गुंगी

## १९) प्रशासकीय नियम व सुविधा– वसतिगृहांचे उद्देश, प्रशासकीय जबाबदारी, आर्थिक बाबी

१) मुंबई राज्यात मागासवर्गीय मुलांसाठी पहिले शासकीय वसतिगृह ...... या वर्षी सुरू करण्यात आले.

१) सन १९२० २) सन १९२२ ३) सन १९२५ ४) सन १९२६

२) महाराष्ट्र शासनाच्या प्रत्येक कार्यालय किंवा विभाग हे कोणत्या अधिनियमाखाली नागरिकांची सनद प्रसिद्ध करतात ?

१) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

२) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५

३) कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५

४) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.

३) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार प्रत्येक कार्यालयाचा किंवा विभागाचा प्रमुख, त्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित सर्व बाबीवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांचे किती स्तर निर्धारीत केले आहेत.

१) दोन २) तीन ३) पाच ४) सहा

४) शासनाच्या 'व्यय अग्रक्रम' समितीमध्ये खालीलपैकी कोणाचा समावेश नाही ?

१) मुख्यमंत्री २) वित्त मंत्री ३) मुख्य सचिव ४) वित्त सचिव

५) खालील वित्तीय प्रकाशन वित्त विभागाकडून तयार करण्यात येत नाही.

१) ग्रीन बुक (Green Book) २) यलो बुक (Yellow Book)

३) व्हाईट बुक (White Book) ४) ब्ल्यू बुक (Blue Book)

६) शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत ...... ही बाब ''शिक्षा'' या सदरात समाविष्ट होत नाही.

१) ठपका ठेवणे २) निलंबन करणे ३) वेतनवाढ रोखून ठेवणे ४) पदोन्नती रोखून धरणे

# २०) मानसिक, बौद्धिक, व्यक्तिमत्व व कौशल्य, नवीन उपक्रम

१) मानसशास्त्रीय क्षेत्रातील मनोविश्लेषणात्मक उपपत्तीचा जनक ...... आहे.

१) सिग्मंड फ्रॉईड  २) गेसेल  ३) पियाजे  ४) एरिकसन

२) व्यक्तिमत्त्वाच्या सुप्त व अबोधमनात दडलेल्या या प्रवृत्तींचा, दडपल्या गेलेल्या इच्छा वासनांचा शोध घेण्यासाठी कोणत्या मूल्यमापन पद्धतीचा उपयोग करतात ?

१) पडताळासूची  २) प्रासंगिक नोंदी  ३) पदनिश्चयन श्रेणी  ४) प्रक्षेपण पद्धती

Study CIRCLE

**अधिक माहितीसाठी आणि स्टडी सर्कलचा कोर्स जॉइंट करण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा**

https://www.studycircleonline.com/courses/officer-recruitment-exam-course-in-social-welfare-commissionerate/42

# : उत्तरे :

# समाजकल्याण आयुक्तालयातील अधिकारी भरती परीक्षा

## (१) समाजकार्य – इतिहास व तत्त्वज्ञान, समाजशास्त्र व अर्थशास्त्र

१–४ २–३ ३–३ ४–४ ५–१ ६–२ ७–३
८–३ ९–४ १०–३ ११–४ १२–४ १३–३ १४–२
१५–२ १६–४ १७–३ १८–२ १९–४ २०–३ २१–३
२२–३ २३–३ २४–१ २५–१ २६–४

## (२) मानवी अभिवृद्धी व व्यक्तिमत्व विकास – व्यक्तिमत्व व सामाजीकरण

१–२ २–१ ३–३ ४–४ ५–१ ६–२ ७–३
८–३ ९–३ १०–४ ११–२ १२–४ १३–१ १४–४
१५–४ १६–२ १७–२ १८–३ १९– २०–१ २१–१
२२–२ २३–१ २४–३ २५–४ २६–३ २७–३ २८–२
२९–२ ३०–२ ३१–४ ३२–४ ३३–३ ३४–४ ३५–१
३६–३ ३७–४ ३८–३ ३९–२ ४०–४ ४१–१ ४२–३
४३–३

## (३) भारतीय सामाजिक समस्या व उपाययोजना, सामाजिक विकास उपक्रम

१–१ २–३ ३–२ ४–४ ५–१ ६–३ ७–४
८–४ ९–२ १०–३ ११–३ १२–१ १३–३ १४–२

## सामाजिक समस्येवरील उपाययोजना व विकास उपक्रम

१–१ २–१ ३–१ ४–२ ५–३ ६–२ ७–१
८–१ ९–४ १०–३ ११–३ १२–१ १३–४ १४–२
१५–१ १६–३ १७–४ १८–४ १९–१ २०–४ २१–१
२२–१ २३–३ २४–२ २५–२

## (४) समाजकल्याण प्रशासन – धोरणे, शासकीय व अशासकीय संघटनांचे कार्यक्रम व सेवा

१–४ २–१ ३–४ ४–२ ५–२ ६–२ ७–१
८–१ ९–१ १०–२ ११–४ १२–२ १३–३ १४–२
१५–३ १६–४ १७–४ १८–४ १९–१ २०–१ २१–४
२२–१ २३–३ २४–४ २५–२ २६–२ २७–१ २८–४

## (५) सामाजिक सुरक्षा कायदे – (पीसीआर, पीओए, बालकामगार)

१–४ २–१ ३–४ ४–२ ५–१ ६–२ ७–४
८–३ ९–४ १०–२ ११–२ १२–४ १३–३ १४–४
१५–२ १६–४ १७–४ १८–३ १९–२ २०–४

## (६) सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका व स्वयंसेवी संस्थांचे योगदान व हस्तक्षेप

१–२ २–२ ३–४ ४–३ ५–३ ६–३ ७–३
८–४ ९–१ १०–३ ११–२ १२–१ १३–२ १४–१
१५–२ १६–२ १७–३ १८–२ १९–३ २०–२ २१–४
२२–४ २३–४ २४–४ २५–४ २६–३ २७–३ २८–२

## (७) इतिहास

१–२ २–२ ३–३ ४–४ ५–४ ६–२ ७–४
८–२ ९–१ १०–१ ११–२ १२–२ १३–४ १४–२
१५–३ १६–१ १७–४ १८–२ १९–१ २०–४ २१–३
२२–३ २३–२ २४–४

## (८) भूगोल, लोकसमुदाय व पर्यावरण

१-२ २-४ ३-२ ४-४ ५-२ ६-३ ७-४
८-२ ९-४ १०-४ ११-२ १२-१ १३-१ १४-२
१५-१ १६-१ १७-३ १८-१ १९-२ २०-४ २१-४
२२-४ २३-१ २४-४ २५-१ २६-४ २७-३ २८-३

## (९) राज्यव्यवस्था, शासन, राजनीती व स्थानिक प्रशासन

१-३ २-३ ३-२ ४-३ ५-२ ६-१ ७-४
८-२ ९-३ १०-२ ११-३ १२-२ १३-२ १४-२
१५-२ १६-३ १७-२ १८-३ १९-३ २०-३ २१-३
२२-१ २३-४ २४-१ २५-२ २६-३ २७-२ २८-२
२९-२ ३०-२ ३१-४ ३२-२

## (१०) अर्थव्यवस्था

१-२ २-१ ३-२ ४-२ ५-३ ६-३ ७-२
८-४ ९-४ १०-३ ११-१ १२-१ १३-३ १४-२
१५-१ १६-३ १७-२ १८-३ १९-३ २०-२ २१-४
२२-१ २३-३ २४-३ २५-१ २६-१ २७-४ २८-२
२९-३ ३०-४ ३१-२ ३२-४ ३३-२ ३४-१ ३५-१

## (११) विज्ञान

१-३ २-१ ३-४ ४-२ ५-४ ६-३ ७-३
८-२ ९-४ १०-१ ११-१ १२-१ १३-१ १४-१
१५-२ १६-३ १७-१ १८-३ १९-१ २०-२ २१-३
२२-२ २३-३ २४-१ २५-४

## (१२) चालू घडामोडी

१-२ २-२ ३-२ ४-१ ५-२ ६-२ ७-१
८-१ ९-२ १०-४ ११-३ १२-१ १३-२ १४-२
१५-१ १६-२ १७-३ १८-४ १९-३ २०-२ २१-४
२२-३ २३-३ २४-१ २५-४ २६-३ २७-३ २८-४
२९-१ ३०-१ ३१-२ ३२-१ ३३-४ ३४-१ ३५-१
३६-४

## १३) अध्यापन अभियोग्यता

१-१ २-३ ३-३ ४-३ ५-४ ६-४ ७-१
८-३ ९-१ १०-२ ११-१

## १४) संशोधन अभियोग्यता

१-१ २-१ ३-२ ४-४ ५-२ ६-२

## १५) वाचन आकलन, आधारसामग्री अर्थउकल

१-४ २-२ ३-३ ४-२ ५-३ ६-३ ७-१
८-२ ९-२ १०-४

### आधारसामग्री अर्थउकल

१-१ २-२ ३-३ ४-३ ५-३ ६-१ ७-१
८-२ ९-१ १०- ११-३

## १६) संप्रेषण, माहिती व संज्ञापन तंत्रज्ञान

१-३ २-२ ३-३ ४-३ ५-२ ६-१ ७-४
८-१ ९-१ १०-३ ११-३ १२-४ १३-३ १४-१

### माहिती व संज्ञापन तंत्रज्ञान

१-२ २-२ ३-४ ४-१ ५-१ ६-३ ७-३
८-१

## १७) उच्च शिक्षण पद्धती

१-४ २-२ ३-२ ४-१ ५-४ ६-१ ७-१
८-३

## १८) गृहविज्ञान -पोषक आहार, उपचारशास्त्रीय अन्न

१-२ २-२ ३-४

## १९) प्रशासकीय नियम व सुविधा- वसतिगृहांचे उद्देश, प्रशासकीय जबाबदारी, आर्थिक बाबी

१-२ २-१ ३-२ ४-१ ५-२ ६-२

## २०) मानसिक, बौद्धिक, व्यक्तिमत्व व कौशल्य, नवीन उपक्रम

१-१ २-४

Study CIRCLE